वर्ष-०९ | अंक - ४१ | मुंबई, मंगळवार २९ अगस्त ते ०४ सप्टेंबर २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 मुंबईत होणा-या इंडिया आघाडीच्या बैठकीची जय्यत तयारी, कसा असणार कार्यक्रम?

3 → तोच चंद्रमा नभात...!

फोन टॅपिंग प्रकरण बंद! ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## थोडक्यात

### पावसाचे दिवस यंदा कमीच, सप्टेंबरच्या सुरुवातीस जोरदार सरी अपेक्षित

**मुंबई** : मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये ऑगस्ट महिन्यात तुरळक ठिकाणी एखाद-दुसरी जोरदार सर मुंबईकरांनी अनुभवली. मात्र हा विषम वर्षाव केवळ ऑगस्टपुरता मर्यादित नसून यंदा १ जूनपासूनच मुंबईमध्ये पावसाचे असमान पर्जन्यमान झाल्याचे दिसत आहे. १ जूनपासून सुरू झालेल्या पावसाळा ऋतुच्या ८८ दिवसांमध्ये केवळ २० दिवसांमध्ये लक्षणीय पाऊसमानाची नोंद झाली आहे. ऑगस्टमध्ये तर केवळ तीन दिवस १० मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस पडला आहे. या संदर्भात पाऊसमानाच्या पद्धतीचा अधिक अभ्यास होण्याची गरज व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या ८८ दिवसांमध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये ३१ टक्के अतिरिक्त पाऊस झाला आहे. तर मुंबई शहरामध्ये सरासरीहून चार टक्के कमी पाऊस नोंदवला गेला आहे. जूनच्या अखेरच्या आठवड्यात पाऊस सक्रिय झाल्यानंतर जूनमध्ये तीनच दिवस ५० मिलीमीटरहून अधिक पाऊस नोंदवला गेला. जुलैमध्ये पहिल्या आठवड्यात पाऊस सक्रिय होता. त्यानंतर पुन्हा १६ जुलैपासून पावसाचा जोर वाढला. हा जोर जुलैअखेरपर्यंत कायम होता. त्यानंतर पुन्हा ऑगस्टमध्ये जोर कमी झाला.

### बीडीडी चाळींसाठी गृहनिर्माणकडून यादी जाहीर; दुकानांसाठी 'ही' कागदपत्रे बंधनकारक

**मुंबई** : राज्य सरकारने बीडीडी चाळींच्या पुनर्विकासास चालना देण्यासाठी त्यातील दुकानांची पात्रता निश्चितीसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये गृहनिर्माण विभागाने ठरविलेल्या अंतिम सहापैकी तीन कागदपत्रे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने वरळी, ना. म. जोशी मार्ग, नायगाव येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाची जबाबदारी म्हाडाकडे सोपविली आहे. त्याप्रमाणे तिन्ही भागांतील प्रकल्पांसाठी कंत्राटदारांची नेमणूक झाली असून तिथे कामे सुरू आहेत. त्या ठिकाणी राहणा-या रहिवाशांना त्याच परिसरात संक्रमण शिबिरे देण्यात आली आहेत. त्याप्रमाणे करार करणा-या रहिवाशांना संक्रमण शिबिराची सुविधा देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे म्हाडाने रहिवाशांना पयार्यी वास्तव्यासाठी भाडे रक्कमेचाही पर्याय दिला आहे. सद्यस्थितीत या तीन्ही चाळींकडे असलेले अनधिकृत स्टॉल्स राज्य सरकारच्या प्रचलित धोरणानुसार नियमित करावेत, अशी मागणी अखिल बीडीडी चाळ स्टॉलधारक संघाने केली होती. त्याप्रमाणे, सरकारने यापूर्वीच १ जानेवारी २००० पूर्वीच्या सुमारे ३५९ स्टॉल नियमित करण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे पात्रता निश्चित केल्यास अनेक दुकाने अपात्र ठरण्याची शक्यता लक्षात घेत गृहनिर्माण विभागाने त्यासंदर्भात कागदपत्रांची नवीन यादी जाहीर केली आहे.

### गोंडस कुत्र्यावरुन बहिणी तरुणाला भिडल्या; शर्ट ओढला, हात मोडला, भररस्त्यात राडा

**अंबरनाथ:** कुत्र्याचा पिल्लावरून दोन गटात तुफान हाणामारी झाल्याची घटना अंबरनाथमध्ये घडली आहे. या मारहाणीत एका महिलेच्या हातावर जबर मार लागला आहे. या मारहाणीचा लाईव्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. अमित रेवाले हे वास्तव्यास असलेल्या परिसरात रस्त्यावरून जात असताना कुत्र्याचा पिल्लू दिसला. त्या पिल्लाला काही जण त्रास देत असल्याचं अमितला दिसून आलं. तेव्हा अमित त्याच्याजवळ गेला आणि त्या कुत्र्याच्या पिल्लाला आपल्या ताब्यात घेतलं. त्यानंतर त्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून या पिल्लाला दत्तक घेण्यासाठी पोस्ट करत आवाहन केले. अमित यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत बदलापूरच्या दोन तरुणींने दत्तक घेण्यास तयार असल्याचं सांगितलं. मात्र, अमित आणि या दोन्ही बहिणी भेटल्यावर त्यांच्यामध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर या दोन्ही

# विकासनिधी सत्ताधा-यांकडेच, आगामी निवडणुकांबाबत विरोधकांविरोधात रणनिती... यांना सर्वाधिक निधी

## मुंबई पालिकेचा 600 कोटींचा निधी भाजप आणि शिवसेनेकडे

**मुंबई** : आगामी लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांबरोबरच मुंबई महापालिका निवडणुकीतही विरोधकांना चार हात लांब ठेवण्यासाठी सत्ताधा-यांनी रणनीती आखली आहे. मुंबईतील विकासकामे मार्गी लावण्यासाठी मुंबई महापालिकेकडून देण्यात आलेला जवळपास ६०० कोटी रुपयांचा निधी भाजप आणि शिवसेनेच्या आमदारांच्या मतदारसंघांतच वळवण्याची पुरेपूर तरतूद केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरून समोर आले आहे.

साहजिकच या आमदारांनीही आपापल्या माजी नगरसेवकांच्या वॉर्डांतील विकासकामांना चालना देत मतदारांना आकर्षित करण्याची तयारी सुरू केली आहे. मुंबई महापालिकेतील लोकनियुक्त प्रतिनिधींचा अर्थात नगरसेवकांचा कार्यकाळ ७ मार्च, २०२२ रोजी संपुष्टात आला. त्यानंतर महापालिकेच्या निवडणुका न झाल्याने मुंबई महापालिकेत जनतेमधून निवडून आलेले लोकप्रतिनिधी नाहीत. साहजिकच विद्यमान खासदार तसेच आमदार यांच्याकडून संबंधित विभागांमध्ये विविध विकासकामे तसेच पायाभूत सुविधांची कामे करता यावीत यासाठी महापालिका प्रशासनाकडून पत्रे मागविण्यात आली. यासाठी आमदारांनी आपापल्या विधानसभा मतदारसंघांतील वॉर्डनिहाय कामे सुचवायची होती. त्याबाबतची पत्रे त्यांनी मुंबई शहर पालकमंत्र्यांकडे किंवा मुंबई उपनगर पालकमंत्र्यांकडे द्यायची होती. त्यानंतर संबंधित पालकमंत्री ही पत्रे पालिका प्रशासनाकडे देणार आणि त्यानंतर निधी मंजूर केला जाणार असे ठरविण्यात आले. यानुसार महापालिकेने निधीचे वाटप केले आहे. सन २०२२-२३ या वर्षात मुंबईतील १५ मतदारसंघांमध्ये ६९ कोटी ७६ लाख रु. तर २०२३-२४मध्ये ३४० कोटी ५८ लाख रु. असा एकूण ४१० कोटी ३४ लाख



रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

बोरिवली, दहिसर, मागाठाणे, मुलुंड, कांदिवली पूर्व, चारकोप, गोरेगाव वसोर्वा, अंधेरी पश्चिम, विलेपार्ले, घाटकोपर पश्चिम, कुर्ला, वांद्रे पश्चिम आणि मलबार हिल अशा १५ विधानसभा मतदारसंघांमध्ये हा निधी देण्यात आला आहे. या विधानसभा मतदारसंघांमध्ये सुनील राणे (बोरिवली, भाजप), मनीषा चौधरी (दहिसर, भाजप), प्रकाश सुर्वे (मागाठाणे, शिवसेना), मिहीर कोटेचा (मुलुंड, भाजप), अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व, भाजप), योगेश सागर (चारकोप, भाजप), विद्या जयप्रकाश ठाकूर (गोरेगाव, भाजप), भारती लव्हेकर (वसोर्वा, भाजप), अमित साटम (अंधेरी पश्चिम, भाजप), पराग अळवणी (विलेपार्ले, भाजप), दिलीप लांडे (चांदिवली, शिवसेना), राम कदम (घाटकोपर, पश्चिम भाजप), मंगेश कुडाळकर (कुर्ला, शिवसेना), आशीष शेलार (वांद्रे पश्चिम, भाजप) आणि मंगलप्रभात लोढा (मलबार हिल, भाजप) यांचा समावेश आहे. यात भाजपच्या १२ तर शिवसेनेच्या ३ आमदारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या धोरणाव्यतिरिक्तही पालिका प्रशासनाने प्रभागनिहाय जवळपास २०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यातही सत्ताधारी पक्षांच्या माजी नगसेवकांच्या प्रभागांचा सर्वाधिक समावेश असल्याचे कागदपत्रांवरून दिसते.

ज्या आमदारांच्या मतदारसंघांत निधी मंजूर झाला आहे, ते संबंधित आमदार नंतर आपल्या मतदारसंघातील कोणत्या वॉर्डांतील कामे करायची आहेत, ते निश्चित करत आहेत. ते महापालिकेच्या अधिका-यांना निधी कुठे आणि कसा खर्च करायचा याच्या सूचना देत आहेत. साहजिकच त्यांच्या पक्षाच्या माजी नगरसेवकांच्या वॉर्डांतील कामे तातडीने होत आहेत.

### उद्धव, अजित पवार गटाला प्रतीक्षाच

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सुनील प्रभू, अजय चौधरी या आमदारांनीही कामांची यादी दिली आहे. मात्र ही यादी पुढेच सरकली नसल्याचे मंजूर निधीवरून दिसून येते. अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमधील गट अलीकडेच सत्तेत सहभागी झाला. मात्र त्याआधीच निधीचे वाटप झाल्याने त्यांच्या हाती काही लागले नसल्याचे दिसते.

### यांना सर्वाधिक निधी

भाजपच्या मनीषा चौधरी यांच्या दहिसर विधानसभा मतदारसंघात दोन्ही वर्षांत ४० कोटी रुपयांचा, भाजपच्या भारती लव्हेकर यांच्या वसोर्वा विधानसभा मतदारसंघात ५० कोटी, शिवसेनेच्या मंगेश कुडाळकर यांच्या कुर्ला मतदारसंघात ४५ कोटी ८४ लाख, तर शिवसेनेच्या दिलीप लांडे यांच्या चांदिवली मतदारसंघात २३ कोटी ९४ लाख रुपयाचा निधी देण्यात आला आहे.

## अजित पवार मुख्यमंत्री होणे अशक्य, राष्ट्रवादीचे आमदार शरद पवारांकडे परततील: संभाजीराजे छत्रपती

**मुंबई**: राज्याच्या मुख्यमंत्रिपदाबाबत गेल्या अनेक दिवसांपासून दावे प्रतिदावे केले जात आहेत. यात आता स्वराज्य संघटनेचे संस्थापक आणि माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनीही उडी घेतली आहे. एकनाथ शिंदे यांचे मुख्यमंत्रिपद जाणार आणि अजित पवार हे मुख्यमंत्री होणार असल्याचे बोलले जाते.



मात्र अजित पवार हे मुख्यमंत्री होणार नाहीत, असा दावा छत्रपती संभाजीराजे यांनी रविवारी मुंबईत एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला. राष्ट्रवादीचे सध्या भाजपसोबत आलेले नऊ मंत्री शरद पवार यांच्याकडेच पुन्हा जातील, असा दावाही त्यांनी केला. मी आव्हान देऊन सांगतो, मुख्यमंत्रिपदी एकनाथ शिंदे हेच राहणार. अजित पवार यांना मुख्यमंत्री केले जाणार नाही. हे केवळ लोकसभा निवडणुकांसाठी जुळविलेले गणित आहे. तिन्ही पक्ष विधानसभा निवडणुका एकत्रित लढणार तरी कसे असा प्रश्न संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थित केला. बारामतीच्या सभेत अजित पवार हे, 'मी त्यावेळी मुख्यमंत्री झालो असतो' असे म्हणाले. याचा अर्थ मुख्यमंत्रिपदाची सुप्त इच्छा पूर्ण करण्यासाठी अजित पवार गेले हे समजू शकतो. मात्र असे असले तरी अजित पवार सत्तेसाठी गेले नाहीत तर ईडीच्या भीतीमुळे गेले आहेत. हे महाराष्ट्रातील जनतेला माहीत असल्यामुळे आगामी निवडणुकीत त्याचे परिणाम दिसतीलच, अशी टीका विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी येथे प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना केली.

## सायबर चोरांचा मॅनेजरला तब्बल 39 लाखांना गंडा

### ऑनलाइन टास्कच्या नावाखाली मॅनेजरने 39 लाख गमावले

### यूट्यूब व्हिडीओ लाईक करा पैसे मिळवा, सायबर चोरट्यांचा नवा फंडा

**मुंबई** : सोपे टास्क देऊन बँक खाती रिकामी करण्याचे प्रकार सायबरचोरांकडून सुरूच आहेत. पोलिसांकडून वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृती करूनही नागरिक विशेषतः उच्चशिक्षित तरूण सायबरचोरांच्या जाळ्यात अडकत आहेत. एका कंपनीत मॅनेजर असलेल्या दक्षिण मुंबईतील तरूणाने तब्बल ३९ लाख रुपए टास्कच्या नादात गमावले. मुंबईतील वेगवेगळ्या भागांत आठवड्याभरात अनेकांची टास्कच्या नावाखाली लाखोंची फसवणूक करण्यात आली आहे. कफ परेड येथे वास्तव्यास असलेला ३८ वर्षीय सागर (बदललेले नाव) हा एका प्रसिद्ध कंपनीत मॅनेजर पदावर नोकरीला आहे. सागरच्या मोबाइलवर अनोळखी क्रमांकावरून संदेश आला. यामध्ये मी इन्फ्लुएन्सर असून यूट्यूबच्या वतीने पार्ट टाइम नोकरी घेऊन आलो आहे, असे या संदेशात नमूद केले होते. सागरने संदेशातील लिंकवर क्लिक केले असता, यूट्युबवरील व्हिडिओला लाइक केल्याचा टास्क पूर्ण केल्यास दोनशे रुपये मिळणार, असे नमूद केले होते.



त्यानुसार सागरने एका व्हिडिओला लाइक केल्यावर त्याच्या बँक खात्यात दोनशे रुपये जमा झाले.

सागर त्यानंतर या टास्कच्या कामासाठी अनोळखी व्यक्तीने सुरू केलेल्या टेलिग्राम ग्रुपमध्ये सहभागी झाला. यामध्ये वेगवेगळ्या टास्कबाबत सर्व सदस्य चर्चा करीत होते. अनेकांना बरीच रक्कम मिळत असल्याचे त्याने पाहिले. सागरने अधिक परतावा मिळत असल्याने पेड टास्कमध्ये रक्कम गुंतविली. सुरुवातील १७ हजार गुंतविल्यानंतर सागरच्या खात्यामध्ये २३ हजार रुपये जमा झाले. ते पाहून सागरने गुंतवणुकीची रक्कम वाढविण्यास सुरुवात केली.

## साहेबांच्या विरोधात सूर, बीडकरांचा गोंधळ, 2 मिनिटांत भाषण गुंडाळावं लागलं, रोहित पवारांचा निशाणा



**मुंबई** : मंत्री धनंजय मुंडे यांनी आयोजित केलेल्या बीडच्या सभेत ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यावर सडकून प्रहार केले. तेलगी प्रकरण, पहाटेचा शपथविधी ते दादांचं नेतृत्व यावरून भुजबळांनी फटकेबाजी करताना शरद पवारांना आरोपीच्या पिंज-यात उभं केलं. संपूर्ण भाषणात भुजबळांनी पवारांना टार्गेट केलं. आधीच लांबलेल्या भाषणाला उपस्थित कंटाळले होते. त्यात भुजबळ एकामागून एक पवारांवर वार करत राहिले. हाच धागा पकडून आमदार रोहित पवार यांनी छगन भुजबळांचं नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधलाय. पवारसाहेबांच्या विरोधात सूर निघाल्याने उपस्थित बीडकरांनी गोंधळ केला, त्यामुळे पुढच्या २ मिनिटांत त्यांना भाषण गुंडाळावं लागलं, अशी टीका रोहित पवार यांनी केली. 'सभा बीड जिल्ह्याच्या विकासाची... अस्मितेची... सन्मानाची अन् दुष्काळ मिटवण्यासाठीची... अशी टॅगलाईन वापरून धनंजय मुंडे यांनी बीडमध्ये जंगी सभेचं आयोजन केलं होतं. या सभेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे सगळे मंत्रिगण उपस्थित होते. भव्यदिव्य रॅलीने अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांचे स्वागत करण्यात आले. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून राष्ट्रवादीच्या नेत्यांनी अभिवादन केले.

## नोटबंदीत 1 ट्रिलियन 166 बिलियन 500 मिलियन अतिरिक्त नोटा जमा

### चलनातच नव्हत्या तर या नोटा आल्या कुठून? हायकोर्टात याचिका

साल 2016 मध्ये नोटबंदीत सरकारी तिजोरीत तब्बल 1 ट्रिलियन 166 बिलियन 500 मिलियन नोटा अतिरिक्त जमा झाल्याचा आरोप करत हायकोर्टात याचिका दाखल झाली आहे. मनोरंजन रॉय यांनी ही याचिका केली असून वित्त मंत्रालय, महासंचालक केंद्रीय इकॉनॉमिक्स इंटेलिजन्स ब्युरो, राज्य गृह विभाग प्रधान सचिव यांना या याचिकेत प्रतिवादी करण्यात आलेलं आहे. याप्रकरणाच्या चौकशीची मागणी या याचिकेतून करण्यात आली असून त्यावर सुनावणी पूर्ण करत हायकोर्टानं आपला निकाल राखून ठेवला आहे.




न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर नुकतीच सुनावणी झाली. याचिकाकर्त्यानं माहितीच्या अधिकारात आरबीआयकडे माहिती मागितली होती. जर ती त्यांना मिळाली नाही तर त्याबाबत त्यांनी अपील करायला हवं होतं. नोटबंदी ही सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवलेली आहे. त्यामुळे याची आता नव्यानं काय चौकशी करणार? असा युक्तिवाद सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी केंद्र सरकारकडून केला आहे.

**काय आहे याचिका?**

1 एप्रिल 2000 ते 31 मार्च 2018 पर्यंत 14 ट्रिलियन 113 बिलियन 500 मिलियन पाचशे व एक हजाराच्या नोटा देशात चलनात होत्या. मात्र साल 2016 मध्ये झालेल्या नोटबंदीत 15 ट्रिलियन 208 बिलियन नोटा बॅंकेत जमा झाल्या, अशी माहिती भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या (फ्इक) वार्षिक अहवालातून समोर आली. माहिती अधिकारात आरबीआयनं ही माहिती दिली आहे. याचा अर्थ चलनात नसलेल्या 1 ट्रिलियन 166 बिलियन 500 मिलियन नोटा अतिरिक्त जमा झाल्या आहेत. त्यामुळे त्याची चौकशी झाली पाहिजे, या अतिरिक्त नोटा कोणी जमा केल्या? कशा जमा केल्या? याची चौकशीसाठी विविध यंत्रणांकडे तक्रार करण्यात आली. मात्र त्यावर काहीच कारवाई झाली नाही, त्यामुळे हायकोर्टात ही याचिकेत करण्यात आल्याचा दावा याचिकेतून करण्यात आला आहे.

भारतात महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल याच राज्यांत नोटांची छपाई होते. तर मुंबई, नोएडा, कोलकत्ता आणि हैद्राबाद इथं नाणी तयार केली जातात. 8 नोव्हेंबर 2016 रोजी देशात नोटबंदी लागू झाली त्यात एक हजार आणि पाचशेची नोट चलनातून रातोरात बाद करण्यात आली. या नोटबंदीनंतर पाचशे आणि एक हजारच्या किती नोटा बॅंकेत जमा झाल्या? याची माहिती माहिती अधिकाराखाली आरबीआयकडे मागितली होती. त्यावर अशी कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचं आरबीआयनं सांगितल. त्यामुळे जर आरबीआयवर कोणाचंच नियंत्रण नाही तर त्यांचा मनमानी कारभार सुरु आहे का?,

### ठाणे महापालिका सफाई कर्मचा-यांना दिलासा देणारी बातमी... थकित वेतनाबाबत मोठा निर्णय

**ठाणे** : ठाणे शहराची दैनंदिन साफसफाई करणा-या कंत्राटी सफाई कर्मचा-यांना थकीत वेतन मिळवण्याचा मोकळा झाला आहे. तब्बल ४५ सफाई कामगारांना थकीत तीन महिन्यांपैकी दोन महिन्यांचे वेतन मिळणार आहे. त्यामुळे आंदोलनाच्या पवित्र्यात असलेल्या या कर्मचा-यांना दिलासा मिळाला आहे. ठाणे पालिकेने सफाई खात्यात ठेकेदाराच्या माध्यमातून ४५ हून अधिक कर्मचा-यांची नियुक्ती केली आहे. या कर्मचा-यांना ठेकेदाराकडून वेतन दिले जाते. मात्र, तीन महिन्यांपासून वेतन मिळत नसल्यामुळे कर्मचारी हवालदील झाले होते. या ठेकेदाराने कर्मचा-यांच्या भविष्यनिर्वाह निधीची रक्कमही सरकारकडे जमा केलेली नाही. त्यामुळे संतप्त कर्मचा-यांनी ठाणे पालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. वेतन न मिळालेले कामगार प्रवेशद्वारावर आल्याने गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. अखेर भाजपचे माजी गटनेते मनोहर डुंबरे, नारायण पवार आणि परिवहन समितीचे सदस्य विकास पाटील यांनी कामगारांची व्यथा समजूत घेत पालिकेच्या घनकचरा विभागात धाव घेतली.

## गोड जिलेबी खाल्यानंतर ग्राहकाने बदलला रंग... विक्रेत्याचं डोकं थेट तेलाच्या कढईत, बघ्यांच्या अंगावर काटा

**ठाणे** : जिलेबीचे पैसे मागितल्याने एकाने जिलेबी विक्रेत्याच्या डोक्यावर लोखंडी वजन मारल्याने विक्रेता तोल जाऊन हातगाडीवरील उकळत्या तेलाच्या कढईवर पडला. त्यामुळे हा विक्रेता गंभीर जखमी झाला असून हा प्रकार ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये घडला. आरोपीविरुद्ध श्रीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेला तीन दिवस उलटूनही आरोपीला अटक झालेली नाही.

राजेश यादव असे या जखमी जिलेबी विक्रेत्याचे नाव आहे. सध्या त्याच्यावर ऐरोली येथील नॅशनल बर्न रुग्णालयात उपचार चालू



आहेत. राजेश याच्या मोठ्या भावाचे रोड नं. २२ येथे मिठाईचे दुकान असून या दुकानाच्या समोरच तो हातगाडीवर जिलेबी बनवून विक्री करतो. २५ ऑगस्टला रात्री ९.१५ वाजता राजेश जिलेबी तयार करत असताना आरोपी सरवन तेथे आला. त्याने जिलेबी खाल्ल्यानंतर पैसे दिले नाहीत. पैशाची मागणी केल्यानंतर सरवन शिवीगाळ करत तेथून निघून गेला. थोड्या वेळाने सरवन पुन्हा त्याठिकाणी आला आणि त्याने भाजीविक्रेत्याकडील लोखंडी वजन माप राजेशच्या डोक्यात मारले. डोक्याला गंभीर दुखापत होऊन राजेश तोल जाऊन हातगाडीवरील उकळत्या तेलाच्या कडईवर पडला. कडईमधील गरम तेल राजेशच्या अंगावर आणि चेह-यावर पडल्याने तो गंभीररित्या भाजला असून या प्रकारानंतर सरवन पळून गेला. राजेशच्या ओरडण्याचा आवाज ऐकून त्याचे भाऊ धावून आले.

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार २९ अगस्त ते ०४ सप्टेंबर २०२३

## बालविवाहांचे वाढते प्रमाण चिंताजनक;
# तीन वर्षात 'इतके' विवाह रोखण्यात प्रशासनाला यश...

**ठाणे:** चार दिवसांपूर्वी सोने आणि पैशाच्या आमिषाने बाळकूम परिसरात एका १४ वर्षांच्या मुलीचा विवाह ४२ वर्षांच्या व्यक्तीशी लावून देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. यावरून ग्रामीण आणि आदिवासी परिसराबरोबरच आजही ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात बालविवाह होत असल्याचे अधोरेखित होत आहे. करोना काळाच्या बिकट परिस्थितीनंतर बालविवाहाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे. गेल्या तीन वर्षांत महिला व बाल विकास विभागाला जिल्ह्यात १९ बालविवाह रोखण्यात यश आले आहेत. यामध्ये गेल्या तीन वर्षांत ठाणे शहरात सर्वाधिक, पाच बालविवाह रोखले गेले आहेत.



बालविवाह कुप्रथा रोखण्यासाठी २००६ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्यात आला असला तरी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने आजही आदिवासी भागासह शहरी भागात ही प्रथा सुरू आहे. बालविवाह कायद्याने गुन्हा असला तरी मोठ्या प्रमाणात छुप्या पद्धतीने बालविवाह सुरूच असल्याचे वास्तव आहे. आदिवासी भागांतील कुपोषण व बालमृत्यूच्या समस्येमागे बालविवाह हे महत्त्वाचे कारण असल्याचे विविध अहवालांतून स्पष्ट होते. सध्या आदिवासी व ग्रामीण परिसरासह शहरातही बालविवाहाचे लोण वाढत आहे. गेल्या तीन वर्षांतील आकडेवारी पाहिल्यास ठाणे शहरातील पाच, डोंबिवलीत दोन, उल्हासनगरात तीन, मुरबाडमध्ये एक, शहापूरमध्ये तीन, कल्याणात तीन, भिवंडीत दोन असे बाल संरक्षण कक्ष, स्थानिक पोलिस, सामाजिक संस्था, महिला व बालविकास विभागाचे संरक्षण अधिकारी यांच्या माध्यमातून बालविवाह रोखण्यात यश आले आहे.

**योजनेचा लाभ नाही**

बालविवाहामुळे त्या मुलींच्या मानसिक व शारीरिक परिणाम तर होतोच, शिवाय मुलींना भविष्यात कोणताही सरकारी लाभ मिळू शकत नाही. बालविवाह झाल्यामुळे त्या मुलींची विवाहाची नोंदणी नसते, रेशनकार्डवर नाव नसते, किंवा विवाह झाल्याचा कोणताही पुरावा नसल्यामुळे अशा महिलांना सरकारच्या संजय गांधी योजनेसारख्या कोणत्याच योजनेचा लाभ मिळू शकत नाही. बालविवाह रोखण्यासाठी तक्रार आल्यानंतर यंत्रणा कामाला लागते.

## सप्तपदींपूर्वीच आगीच्या ज्वाळांनी घेरलं, फ्लाईट लांबलं सांताक्रूझ हॉटेलच्या आगीत युगुलाचा मृत्यू
# सांताक्रूझ येथील हॉटेल गॅलेक्सीला आग... गुजरातच्या जोडप्याचा करुण अंत

**मुंबई:** सांताक्रूझ (पूर्व) प्रभात कॉलनी येथील हॉटेल गॅलेक्सीच्या दुस-या मजल्यावरील खोलीला रविवारी दुपारी लागलेल्या आगीत गुजरातच्या एका जोडप्याचा आणि एका व्यावसायिकाचा मृत्यू झाला. ज्या जोडप्याचं काहीच दिवसात लग्न होणार होतं. तर अन्य तीन जण जखमी झाले आहेत. ज्या तिघांचा मृत्यू झाला ते अहमदाबादहून आले होते आणि नैरोबीला उड्डाण करणार होते. त्यांना विमान कंपनीने ग्राउंड-प्लस चार मजली हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली होती. कारण, त्यांच्या फ्लाइटचे वेळापत्रक बदलले होते. केनियाचे नागरिक रुपल कानजी धनजी (२५), किशन प्रेमजी हलाई (२८) आणि व्यापारी कांतीलाल गोरधन वारा (४८) हे तिघेही ३०४ क्रमांकाच्या खोलीत होते. वाकोला पोलिसांनी तीन वेगवेगळ्या अपघाती मृत्यूची नोंद केली आहे आणि अद्याप एफआयआर दाखल करणे बाकी आहे कारण ते कथित उल्लंघनांबद्दल अग्निशमन विभागाच्या अहवालाची प्रतीक्षा करत आहेत. मुख्य अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''आम्ही हॉटेलच्या कागदपत्रांची तपासणी करू आणि इन्स्पेक्शनही करु. सुरक्षेचे उल्लंघन आढळल्यास कारवाई केली जाईल.''



अग्निसुरक्षा नियमांचे पालन न केल्यामुळे १९६६ मध्ये बांधलेल्या गॅलेक्सी हॉटेलला बीएमसीने अलीकडेच नोटीस बजावली होती. बीएमसी एच-ईस्ट वॉर्डचे आरोग्य अधिकारी डॉ सतीश बडगिरे यांनी सांगितले की, ''आम्ही हॉटेलच्या विरोधात न्यायालयात खटला दाखल केला आहे, परंतु अद्याप आमच्या नोटीसला उत्तर दिलेले नाही.'' अन्य एका नागरी अधिकाऱ्याने असा आरोप केला की हॉटेलने संरचनात्मक बदल केले आहेत आणि उल्लंघनासाठी इमारत आणि कारखाना विभागाकडून कारवाई केली जाईल.

हॉटेलच्या एका कर्मचा-याने टाइम्सला सांगितले की, रूम नंबर 204 मध्ये राहणा-या हार्दिक भटने एसी चालू केल्यावर आग लागली आणि युनिटमधून ठिणग्या निघाल्या. ''तो लगेच खाली आला आणि अग्निशामक यंत्राचा वापर करून आग विझवण्याचा प्रयत्न करणा-या कर्मचा-यांना याची माहिती दिली. कर्मचाऱ्यांनी विझविण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत पडद्यांना आग लागली आणि आग वेगाने पसरू लागली. त्यानंतर आम्ही अग्निशमन दलाला फोन केला. '', असं कर्मचा-याने सांगितलं. अग्निशमन दल पोहोचणार तोपर्यंत ही आग वरच्या मजल्यापर्यंत पोहोचली होती.

त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी काचेच्या खिडक्या फोडून आथ प्रवेश केला आणि वेगवेगळ्या खोल्यांमधून ९ जणांची सुटका केली. ''व्यापारी कांतीलाल

# मुंबईत होणा-या इंडिया आघाडीच्या बैठकीची जय्यत तयारी, कसा असणार कार्यक्रम?



**मुंबई :** भाजप आणि मोदी सरकारविरोधात विरोधकांनी एकत्रित येऊन इंडिया आघाडीची मूठ बांधली. पाटणा, बंगळुरुनंतर आता मुंबईत विरोधकांच्या इंडिया आघाडीची बैठक होणार आहे. मुंबईत येत्या 31 ऑगस्ट आणि 1 सप्टेंबर या दोन दिवशी इंडिया आघाडीची बैठक पार पडणार आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गट, शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस गट आणि काँग्रेस हे तिन्ही पक्ष समन्वयाने बैठकीच्या आयोजनाच्या तयारीसाठी लागले आहेत. मुंबईतील ग्रँड हयात या पंचतारांकित हॉटेलमध्ये या बैठकीचे आयोजन करण्यात आलं आहे. या बैठकीच्या आयोजनाची मुख्य जबाबदारी, यजमान पद हे शिवसेना ठाकरे गटाकडे देण्यात आले आहे. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी येणा-या नेत्यांच्या स्वागताची जबाबदारी देण्यात आली आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून 31 ऑगस्टला डिनरचं आयोजन करण्यात आले तर 1 सप्टेंबरला काँग्रेस पक्षाकडून नेत्यांच्या लंच आयोजन करण्यात आलं आहे. इंडिया बैठकीसाठी महाविकास आघाडीची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या बैठकीत सर्व पक्षांचे समन्वय करण्याबाबत समिती नेमण्यात येणार आहे. ही समिती अकरा जणांची असेल. कोणत्या विषयावर इंडिया आघाडी भूमिका मांडणार यावर चर्चा होणार आहे. सोबतच इंडिया लोगोचं लॉन्चिंग होणार आहे. इंडिया आघाडीचा जाहीरनामा कसा असेल या संदर्भात चर्चा होईल. महाराष्ट्रातील अणि इतर राज्यातील स्थानिक प्रश्न कोणते जाहीरनाम्यात घ्यायचे यावर चर्चा केली जाईल.

बैठकीसाठी हयात हॉटेलमधील 175 खोल्या नेत्यांसाठी बुक केल्या आहेत. विविध राज्यातून 60 ते 65 नेते बैठकीला राहणार उपस्थित राहणार आहेत. इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी येणा-या नेत्यांचं महाराष्ट्रीयन पद्धतीने स्वागत केलं जाईल. तुतारी, नाशिक ढोलने नेत्यांचे स्वागत होणार आहे.

## कसारा लोकलमध्ये बोगस तिकीट तपासणीसाला अटक; भाजपचा युवा पदाधिकारी असल्याच्या ओळखपत्राचा वापर

**प्रतिनिधि**

डोंबिवली- कसारा-सीएसएमटी लोकलमध्ये गुरुवारी दुपारी डोंबिवली ते दिवा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान एका जागरुक प्रवाशाच्या सतर्कतेमुळे एका बोगस तिकीट तपासणीसाला पकडण्यात रेल्वे अधिकाऱ्यांना यश आले. या बोगस तपासणीसाकडे तिकीट तपाणीस असल्याचे रेल्वेचे बनावट ओळखपत्र, भाजपचा दिंडोशी विधानसभा विभागाचा युवा पदाधिकारी असल्याचे ओळखपत्र आढळून आले आहे. डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्यात या बोगस तिकीट तपासणीसाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेल्वेच्या



माध्यम प्रतिनिधींच्या व्हॉट्सप ग्रुपवर रेल्वे अधिकाऱ्यांनी या तिकिटी तपासणीसाचे तो भाजपचा दिंडोशी विभागाचा युवा पदाधिकारी असल्याचे एक ओळखपत्र प्रसिध्द केले होते. ते शुक्रवारी दुपारी काढून टाकण्यात आले.

## ३० लाख रुपयांचे अमली पदार्थ जप्त

**प्रतिनिधि**

ठाणे – वागळे इस्टेट गुन्हे शाखेने ३० लाख रुपयांचा अमली पदार्थाचा साठा जप्त केला आहे. कोपरी येथील मंगला हायस्कुलजवळ काही व्यक्ती अमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, पोलिसांनी त्या ठिकाणी सापळा रचून ३० लाख रुपयांचे २ किलो ६० ग्रॅम चरस हा अमली पदार्थ जप्त केला आहे. तर, अमली पदार्थ विक्री करणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याला २९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. वागळे इस्टेट गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके हे अमली पदार्थ बाळगणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करत असताना, त्यांना कोपरी भागातील मंगला हायस्कुलजवळ प्रशांत कुमार रामबाबू सिंग (२७) आणि प्रेमशंकर लक्ष्मीनारायण ठाकूर (२३) हे दोघे बिहारहून ३० लाख रुपये किंमतीचा २ किलो ६० ग्रॅम वजनाचा चरस हा अमली पदार्थ विक्रीसाठी आले असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्या भागात सापळा रचला. यामध्ये बेकायदेशीररित्या अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी त्यांच्या विरुद्ध कोपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून २९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या तपासात पोलिसांना नेपाळी चलनी नोटा मिळाल्या असून हा अमली पदार्थ त्यांनी नेपाळहून आणला असल्याचा अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# मैत्रीची छायाचित्रे प्रसारित केल्याने डोंबिवलीत महिलेची आत्महत्या



**प्रतिनिधि**

डोंबिवली – एकाच गावातील निवास असल्याने झालेल्या मैत्रीमधून एका तरुणाने एका महिलेबरोबर मोबाईलमधून छायाचित्रे काढली होती. या छायाचित्रांचा आधार घेऊन आरोपी तरुण महिलेला छायाचित्रे समाज माध्यमावर प्रसारित करण्याची धमकी देऊन सारखे पैसे मागत होता. या सततच्या छळाला कंटाळून महिलेने डोंबिवलीतील देसलेपाडा येथील आपल्या राहत्या घराच्या सहाव्या माळ्यावरून उडी मारून आत्महत्या केली. गेल्या महिन्यात हा प्रकार घडला आहे. मृत महिला ही कष्टकरी घरातील आहे. मजुरीसाठी ती आपल्या कुटुंबासह हरयाणा राज्यातील कैथल जिल्ह्यातील डोंगर पट्टी गावातून डोंबिवलीत आली. ही महिला आपल्या कुटुंबासह डोंबिवली पूर्वेतील देसलेपाडा नवनीतनगर येथील रविकिरण सोसायटीत राहत होती. अजय ऋषीपाल (३३) असे आरोपी तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले, आरोपी अजय आणि मृच महिला हे हरियाणामधील एकाच गावामधील रहिवासी आहेत. त्यांच्यामध्ये मैत्री झाली होती. या मैत्रीतून आरोपी तरुणाने महिलेबरोबर मे महिन्यात मोबाईलमधून छायाचित्रे काढली होती. मैत्रीतून ही छायाचित्रे काढल्याने आरोपी अजय त्याचा दुरुपयोग करील असे महिलेला वाटले नाही. गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत अजयने महिलेला या छायाचित्रांचा आधार घेऊन त्रास देण्यास सुरुवात केली. तू मला पैसे दे, नाहीतर तुझ्यासोबत काढलेली छायाचित्रे मी समाज माध्यमांवर प्रसारित करतो, असे अजय महिलेला सांगू लागला. समाज माध्यमावर आपल्या मैत्रीची छायाचित्रे प्रसारित झाली तर कुटुंबीयांसह समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल, अशी भीती महिलेला वाटू लागली. अजयने पैशाचा तगादा सुरूच ठेवला. महिलेकडून पैसे मिळत नाहीत हे पाहून त्याने मैत्रीची छायाचित्रे समाज माध्यमावर प्रसारित केली. हा प्रकार सहन न झाल्याने महिलेने गेल्या महिन्यात आपल्या राहत्या घराच्या सहाव्या माळ्यावरून उडी मारून आत्महत्या केली. मानपाडा पोलीस ठाण्यात महिलेचा नातेवाईक भीम सिंह यांनी तक्रार केली. पोलिसांनी डोंबिवलीत, हरयाणा येथे जाऊन चौकशी केल्यानंतर हा गुन्हा दाखल केला. साहाय्यक पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## कसारा घाटात मृतदेह, हत्येचा अखेर उलगडा; पोलीस तपासांत धक्कादायक माहिती समोर...
# पोलिसांनी केली चौघांना अटक

**ठाणे :** ठाणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने दुहेरी हत्याकांडाचा छडा लावत चार आरोपींना अटक केली. न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. हत्या झालेल्यांपैकी एकजण महिलेस सोशल मीडियावरून मेसेज आणि फोन करून त्रास देत होता. याच रागातून हे हत्याकांड घडल्याची माहिती समोर आली आहे. कसारा पोलिसांकडून या गुन्ह्याचा तपास करण्यात येत आहे. मुंबई-नाशिक महामार्गालगत कसारा घाटात दोन महिन्यांपूर्वी दोन व्यक्तींचे मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. या प्रकरणी कसारा पोलीस ठाण्यात १९ जून रोजी हत्येचा गुन्हा दाखल झाला. कोणत्यातरी कारणावरून दोघांची हत्या करून नंतर मृतदेह कसारा घाटात आणून टाकण्यात आले होते. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील साहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, पोलीस उपनिरीक्षक महेश कदम आणि




अन्य कर्मचारी, तसेच कसारा पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचा-यांचे तपासासाठी पथक स्थापन करण्यात आले.

सुरुवातीला मृतांची ओळख पटवणे महत्त्वाचे होते. त्यादृष्टीने पोलिसांनी प्रयत्न सुरू केले. महिनाभरानंतर मृतांची ओळख पटली. सुफियान मिराबक्ष घोणे (३३), सहिल फिरोज पठाण (२१) अशी मृतांची नावे असल्याचे स्पष्ट झाले. दोघेही नगरचे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. शिवाय लोणी पोलीस ठाण्यात ते बेपत्ता असल्याबाबत तक्रारही दाखल होती. परंतु, त्यांची नेमकी हत्या कोणी केली, याबाबत गूढ कायम होते. तपासासाठी पोलिसांचे पथक लोणी, शिर्डी येथेही गेले होते. तांत्रिक विश्लेषण आणि अन्य माहितीच्या आधारे गुन्हे शाखेला या दुहेरी हत्याकांडाचा छडा लावण्यामध्ये यश आले. शिर्डी येथील स्थानिक पोलिसांची मदत घेऊन शिर्डीत वास्तव्यास असलेला मनोज शिवाप्पा नाशी (२४) याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने हा गुन्हा अन्य सहका-यांच्या मदतीने केल्याचे सांगितले. अशा प्रकारे या प्रकरणात पोलिसांनी नाशी याच्यासह कुणाल प्रकाश मुदलीयार (२३), प्रशांत अंबादास खलुले (२५), फिरोज दिलदार पठाण (१९) या चौघांना अटक केल्याची माहिती साहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव यांनी दिली. सर्व आरोपी नगरचे असून या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक रमेश तडवी

## संक्रमण शिबिरांचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' नको... उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

**मुंबई :** 'मुंबईतील जुन्या व जीर्ण इमारतींच्या बाबतीत ज्याप्रमाणे त्यांचे बांधकाम स्थैर्य तपासण्यासाठी स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची तरतूद मुंबई महापालिकेच्या धोरणात आहे आणि ऑडिटबाबत वाद असलेल्या प्रकरणांत तांत्रिक सल्लागार समितीचा (टॅक) अहवाल मिळवण्याचे धोरण उच्च न्यायालयाच्या सर्वसाधारण आदेशाप्रमाणे आहे, त्याप्रमाणेच ते ट्रान्झिटच्या इमारतींनाही लागू आहे, अशा भ्रमात कोणी राहू नये. ट्रान्झिटच्या इमारती या मुळातच काही वर्षांपुरत्या असतात आणि त्या कालावधीनंतर त्या रिक्त व्हायलाच हव्यात. त्या इमारतींना बांधकाम



स्थैर्याच्या अहवालाची तरतूद लागूच होत नाही', असा महत्त्वपूर्ण निवाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. माहीम येथील जानकी भवन या चाळीचा पुनर्विकास प्रकल्प संघवी गृहनिर्माण प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमार्फत सुरू आहे. मूळ उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांच्या तातुरत्या निवासासाठी जवळपास १७ वर्षांपूर्वी ट्रान्झिट इमारत उभारली आहे. ही ट्रान्झिटची इमारत धोकादायक बनली असल्याने मुंबई महापालिकेने २०१८मध्ये पावसाळ्यापूर्वी मुंबई महापालिका कायद्याच्या कलम ३५४ अन्वये नोटीस बजावून वीज-पाणीपुरवठा तोडल्याने चार रहिवाशांनी तेव्हा उच्च न्यायालयाच्या सुटीकालीन खंडपीठापुढे याचिका केली होती. त्यावेळी रहिवाशांना राहायचे असेल तर आपल्या जोखमीवर आणि सर्व परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवून राहावे लागेल, असे स्पष्ट करत वीज-पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचा अंतरिम आदेश खंडपीठाने दिला होता.

मात्र, आता ट्रान्झिट इमारत धोकादायक असूनही १८ रहिवासी राहत आहेत आणि त्यांच्यामुळे प्रकल्प रखडून उर्वरित ८५ रहिवाशांचे नव्या कायमस्वरूपी घराचे स्वप्न लांबत असल्याचे पाहून न्या. गौतम पटेल व न्या. कमल खाटा यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. या प्रकरणात पूर्वी ट्रान्झिट इमारतीच्या बांधकाम स्थैर्याच्या अहवालांवरूनही वाद होता. मात्र, 'ट्रान्झिट इमारती या मुळातच विशिष्ट कालावधीसाठी म्हणजे तीन ते पाच वर्षांसाठी बांधल्या जातात. म्हणूनच नियोजन प्राधिकरण अशा इमारतींना परवानगी देताना सर्वसाधारण इमारतींप्रमाणे कठोर अटी लावत नाही. अशा इमारतींच्या दुरुस्तीचा किंवा त्या स्थायी स्वरूपाच्या करण्याचा प्रश्नही उद्भवत नाही. त्यामुळे अशा इमारतींच्या बाबतीत बांधकाम स्थैर्य तपासणारा स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल मिळवणे किंवा टॅकचा अहवाल मिळवणे या तरतुदीच लागू होत नाहीत', असे खंडपीठाने आता यानिमित्ताने स्पष्ट केले आहे. तसेच चाळीचे मूळ मालक असलेल्या नागवेकर कुटुंबीयांनी रहिवाशांना पयार्यी ठिकाणी तातुरते घर किंवा दरमहा ३० हजार रुपये देण्याची तयारी दर्शवली असल्याने या १८ रहिवाशांना २६ सप्टेंबरपर्यंत ट्रान्झिटची इमारत रिक्त करावी लागेल, असे खंडपीठाने आपल्या आदेशात नमूद केले. याविषयी नंतर योग्य तो आदेश देण्याचे संकेतही खंडपीठाने दिले.

## जपानी विद्यार्थ्यांनी घेतली मुख्यमंत्र्यांच्या ठाण्याची भेट अन्नदिल्या प्रतिक्रिया !

**ठाणे :** योग सत्र, हिंदी आणि इंग्रजी भाषेची तोंडओळख, भारतीय संस्कृती दर्शन, मुंबई शहर भेट अशा भरगच्च कायक्रमांतर्गत जपानच्या विद्यार्थी ठाणे शहर भेटीवर आले. या भ्रमंतीदरम्यान त्यांनी ठाणे पालिका आयुक्त अभिजित बांगर यांची आवर्जून



भेट घेत विविध विषयांवर चर्चा केली. जपानमधील क्योटो सांग्यो या विद्यापीठाचे २० विद्यार्थी आणि त्यांचे दोन शिक्षक २० ऑगस्टपासून ठाणे शहर भेटीवर आहेत. ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या प्राच्य विद्या संस्था आणि क्योटो सांग्यो विद्यापीठ यांच्यात २०१२ पासून सांस्कृतिक देवाण घेवाण हा कार्यक्रम सुरू आहे. यापूर्वी २०१७ आणि २०१९ मध्ये ठाणे शहराचे तत्कालीन महापौर आणि आयुक्त यांची तसेच विद्यार्थ्यांनी भेट घेतली होती.

पोलीस बातमी पत्र

मुंबई, मंगळवार २९ अगस्त ते ०४ सप्टेंबर २०२३

## संपादकीय...



# स्वार्थी राजकारणासाठी मुंबईला बरबाद करू नका..

*कोविड काळात 'बेसुमार खर्च' केला, 'नियम पायदळी तुडवले' आणि म्हणून 'भ्रष्टाचार केला' अशा कथित आरोपांवरून मुंबई महानगरपालिकेमागे एकापाठोपाठ यंत्रणांचा फेरा लावला जातो आहे. मुळात 'दुष्काळ आवडे सर्वांना' ही म्हण जन्माला आली ती सरकारी यंत्रणांच्या दुष्कमार्तून. त्याला कोणीही अपवाद नाही. दुष्काळ असो वा कोणतीही आपत्ती, संकट... त्यातूनही टाळूवरचं लोणी खाण्याची प्रवृत्ती कदापि स्वीकारार्ह, समर्थनीय होऊ शकत नाही. अशा प्रवृत्ती ठेचून काढल्याच पाहिजेत. पण इथे खेळ सुरू आहे तो चोराची चौकशी दरोडेखोरांनी करण्याचा!*

मी मी म्हणणा-या माणसाला, भल्या भल्या देशांना ताळ्यावर आणण्याचं काम कोविड नावाच्या विषाणूनं तीन वर्षांपूर्वी केलं. सूक्ष्मदर्शी यंत्रातूनच दिसणा-या त्या विषाणूनं संपूर्ण जगाला काही महिने कुलूपबंद करून ठेवलं आणि आपण किती खुजे आहोत, याची आठवण मनुष्यजातीला पुन्हा एकवार झाली. आपल्या जिवाएवढं काहीच मोलाचं नाही, याची लख्ख जाणीवदेखील प्रत्येकाला झाली. कोविडमुळे जगभरात सुमारे ७० लाखांच्या आसपास बळी गेले. तब्बल ७५ कोटी लोकांना या विषाणूने ग्रासलं होतं. जगात असा कोणताही कोपरा शिल्लक राहिला नसेल की जिथे 'काहीही करा पण मला वाचवा, माझ्या कुटुंबाला वाचवा,' अशी आर्त हाक ऐकू आली नाही.

कोविडचा कर्दनकाळ आता मागे पडला असला तरी त्याचं कवित्व मात्र कोणत्या ना कोणत्या रुपानं सुरूच आहे. कोविडचे विपरीत परिणाम माणसांच्या शरीरावर, मनावर आणि समाजाच्या प्रत्येक घटकावर आजही आढळत आहेत. झालं गेलं ते मागं सारून, एकमेकाला सावरण्यासाठी हातभार लावण्याची गरज असताना माणसातील पाशवी प्रवृत्ती पुन्हा जागी झाली की काय, अशी शंका वाटू लागली आहे. या महासाथीत घनदाट लोकसंख्येच्या भारताकडे आणि त्यातही अरुंद वस्तीमध्ये दाटीवाटीची लोकवस्ती असलेल्या मुंबईकडे अवघ्या जगाचं लक्ष होतं. 'मुंबई सुखरूप तर भारत सुखरूप' हे समीकरण अर्थव्यवस्थेच्या पलीकडेदेखील लागू आहेच. मात्र, मोजक्या चौरस मीटरच्या घरांमध्ये कोंबून राहणा-या मुंबईकरांना कोविडचे सर्व नियम पाळणं कसं शक्य होणार होतं? काय करावं, कसं करावं हे डॉक्टरांपासून, शास्त्रज्ञांपर्यंत कोणालाही उमजत नव्हतं, अशा स्थितीत मुंबईचे पालकत्व सांभाळणारी बृहन्मुंबई महानगरपालिका अर्थात 'बीएमसी' मात्र न डगमगता खंबीरपणे उभी राहिली. सुमारे दीडशे वर्षांच्या वाटचालीत अनेक संकटांचा, वादळांचा सामना करीत मुंबईचं पालकत्व सांभाळलेल्या या संस्थेनं, तिच्या असंख्य अधिकारी, कर्मचारी, कामगारांनी अक्षरशः जिवावर उदार होऊन मुंबईला कोविडच्या कराल जबड्यातून बाहेर काढलं. मुंबईलगतच्या जिल्ह्यांतूनच नव्हे तर अक्षरशः देशभरातून आलेल्या रुग्णांना याच महानगरानं जीवदान दिलं. कोविडमुळे नसेल पण कोविडमुळे निर्माण झालेल्या भयावह परिस्थितीनं ग्रासलेल्यांनादेखील अन्न दिलं, आधार दिला. ज्यांनी मदत मागितली त्या प्रत्येकाला सांभाळण्याची जबाबदारी मातृसंस्था म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेवर आली. या संस्थेनं कोणालाही ना म्हटलं नाही. या सगळ्या जबाबदा-या सांभाळताना बीएमसी व बेस्टचे मिळून थोडथोडके नव्हे तर तब्बल ४२५ अधिकारी, कर्मचारी दगावले. सुमारे ११ हजार ६०० हून अधिकजण बाधित झाले. प्रत्येक नागरिक वाचावा, त्याला औषधं, बेड, ऑक्सिजन मिळावा म्हणून कोविड सेंटर, ऑक्सिजन प्लांटसह सगळी यंत्रणा रातोरात उभी करण्यात आली. 'मिळेल तिथून, मिळेल त्या दराने घ्या, तिजोरी रिती झाली तरी चालेल पण माणसं वाचली पाहिजेत,' हा दबाव महानगरपालिकेवर सगळीकडूनच होता. केंद्र सरकारच्या पथकांनीदेखील मुंबईतल्या धारावीसह सगळीकडे जातीने दौरे करून राज्य सरकारला आणि महानगरपालिकेला सक्त सूचना केल्या होत्याच.

हे सगळं आठवायचं कारण म्हणजे, कोविड काळातील कामकाजावरून बीएमसीला लक्ष्य करण्याचं जे राजकारण आज खेळलं जातं आहे, ते होय.

कोविड काळात 'बेसुमार खर्च' केला, 'नियम पायदळी तुडवले' आणि म्हणून 'भ्रष्टाचार केला' अशा कथित आरोपांवरून मुंबई महानगरपालिकेमागे एकापाठोपाठ यंत्रणांचा फेरा लावला जातो आहे. मुळात 'दुष्काळ आवडे सर्वांना' ही म्हण जन्माला आली ती सरकारी यंत्रणांच्या दुष्कमार्तून. त्याला कोणीही अपवाद नाही. दुष्काळ असो वा कोणतीही आपत्ती, संकट… त्यातूनही टाळूवरचं लोणी खाण्याची प्रवृत्ती कदापि स्वीकारार्ह, समर्थनीय होऊ शकत नाही. अशा प्रवृत्ती ठेचून काढल्याच पाहिजेत. पण इथे खेळ सुरू आहे तो चोराची चौकशी दरोडेखोरांनी करण्याचा! बरं, यातून काही फलित हाती लागून समाजाचं, प्रशासनाचं, सरकारांचं भलं होणार आहे, असं समजण्याचादेखील प्रश्न नाही. हे सगळं जनताजनार्दनदेखील जाणून आहे. अमर्याद सत्ता, त्यातून पैसा, त्यातून पुन्हा सत्ता, वर्चस्व याला चटावलेले सगळेचजण एकमेकांच्या जिवावर उठले आहेत, हे कळूनही गेले महिनोनमहिने राज्यातील बहुतेक महापालिकांमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधीसुद्धा नसल्यामुळे जनता काही करू शकत नाही, हतबल आहे. हे सगळं पाहत असताना सामाजिक मनोधैर्य खचलं आहे, याची पुसटशी जाणीवही कोणाला आहे, असं दिसत नाही.

# प्राणवायू सर्वांनाच दिला...



बीएमसीमध्ये ज्यांची पंचवीस-तीस वर्षे मांडीला मांडी लावून सत्ता गाजवली, त्याची फळं चाखली, तेच आता एकमेकांना दुराचारी, भ्रष्टाचारी ठरवायला जिवाचं रान करत आहेत, हेही नसे थोडके. पण यात खरं मरण झाले आहे ते प्रशासकीय यंत्रणेचं. काहीही असलं तरी एक गोष्ट मान्य करावी लागेल ती म्हणजे कोविडच्या साथीमध्ये सगळ्या मुंबईकरांचा विश्वास होता तो फक्त आणि फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेवर, तिच्या यंत्रणेवर. कशाचीही तमा न बाळगता बृहन्मुंबई महानगरपालिकेची ही यंत्रणा अक्षरशः रस्त्यावर उतरली. मुंबईकरांच्या मनातील भीती घालवण्यापासून तर त्यांना दोन वेळेचे जेवण देण्यापर्यंत, वेळेवर उपचार पुरवण्यापर्यंत या यंत्रणेनं काम केले. लॉकडाऊनमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने तब्बल दहा लाख गरजूंना दोन वेळचे जेवण दिले. संपूर्ण देशभरात कोरोनाच्या औषधांचा तुटवडा होता. रुग्ण पैशांच्या थैल्या घेऊन रुग्णालयांत जात होते, मात्र त्यांना बेड मिळत नव्हते. अशावेळी मुंबईने जनतेच्या आशा पल्लवित ठेवल्या. त्यामुळे देशभरातील असंख्य रुग्णांनी प्रसंगी एअर म्ब्युलन्स वापरून उपचारासाठी मुंबईकडे धाव घेतली. मुंबईने दुजाभाव न करता सगळ्यांवर उपचार केले. लाखो रुग्णांचा जीव वाचवला. रुग्णांना प्राणवायूचा (ऑक्सिजन) तुटवडा भासू दिला नाही. यात विशेष उल्लेख करावा लागेल तो एखाद्या चित्रपटातील कथाही फिकी पडेल अशा अणीबाणीच्या प्रसंगाचा. तो म्हणजे एका रात्री अवघ्या सहा तासांत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहा रुग्णालयांमधील १६८ रुग्णांना प्राणवायू उपलब्ध असलेल्या इतर कोविड रुग्णालयांमध्ये सुरक्षितरीत्या स्थलांतर करण्यात आले तो प्रसंग कोणत्याही युद्धापेक्षा सरस ठरला. ज्यावेळी संपूर्ण मुंबई महानगर विश्रांती घेत होतं, तेव्हा महानगरपालिकेच्या यंत्रणेने त्या प्रसंगात केलं ते काम शतकातून एकदा होणारं ठरलं. एकही रुग्ण दगावू न देता सर्वच्या सर्व १६८ रुग्णांना वाचण्याची जी कामगिरी महानगरपालिकेने केली, त्यापुढे कोणत्याही गोष्टीचं मोल होऊच शकत नाही. असे कितीतरी प्रसंग आहेत, जे कोणत्याही कथांपेक्षा कमी नाहीत.

देशात दुस-या राज्यांमध्ये कोविड मृतांचा खच लागत असताना मुंबईत मात्र एकेका रुग्णाचा जीव वाचावा यासाठी महानगरपालिका प्रशासनाने त्या काळात अतोनात प्रयत्न केले, हे नाकारता येणार नाही. कदाचित पहिल्यांदाच जनतेने कागदी घोडे नाचविणा-या यंत्रणेपेक्षा धडाडीनं आणि कौशल्यानं काम करणा-या यंत्रणेचा अनुभव घेतला. केंद्र सरकार, नीती आयोग यांच्याही पलीकडे जाऊन जागतिक नाणेनिधी, जागतिक आरोग्य संघटना आणि कितीतरी देशांच्या सरकारांनी कोविडमधील मुंबई मॉडेलचे जगजाहीर कौतुक केले. कोविडच्या लसीकरणातही मुंबईचा डंका वाजला. आपले ४८२ अधिकारी आणि कर्मचारी गमावूनदेखील बीएमसीची यंत्रणा थांबली नाही, मागे हटली नाही. हे सगळं करत असताना रात्रीतून व्यवस्था उभी करण्याचे केंद्राचे आणि राज्याचे आदेश- 'वाट्टेल ते करा, पाहिजे तर तिजोरी खुली करा, पाहिजे तो दाम मोजा पण माणसं वाचवा,' असे सांगणारे सत्तेतील आणि विरोधातील राजकारणी या सगळ्यांच्या दबावाखाली जाताना महानगरपालिकेच्या यंत्रणेने जे सुचेल ते केलं. त्यात जे पाप झालं आहे, त्याचे वाटेकरी खरेतर सगळेच आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कोविडच्या काळात जी पापं झाली, त्यातही वाटेकरी सगळेच होते की. तेच वाटेकरी आता एकमेकांवर आरोपांची राळ उठवत आहेत, यासारखं निर्लज्ज उदाहरण कोणतं असायला हवं?

# तोच चंद्रमा नभात... !



चंद्र आणि मानवी जीवन यांचं अलौकिक आणि अतूट नातं आहे. भाऊ दूरगावी गेला असेल तर बहीण चंद्राला भावाच्या ठिकाणी समजून त्याला ओवाळते. भावाप्रमाणेच चंद्र मामासुद्धा होतो! तो प्रेमिकांना आनंद देतो; तसाच तो विरहाचंही प्रतीक मानला जातो. पृथ्वीवरून होणारं चंद्राचं दर्शनही विविध स्वरूपात होत असतं. डोंगरांआडून सरकत वर येणारं चंद्रबिंब, कौलारू घरांमागून उगवणारा चंद्र, वाळवंटातल्या आकाशात अनभिषिक्त सम्राटासारखा तेजाळणारा चंद्र, लिंबोणीच्या झाडांमागून डोकावणारा चंद्रमा, खळं पडलेला चंद्र, सरत आलेल्या रात्री होणारं पिकलेल्या चंद्राचं दर्शन, पहाटेची सुंदर चंद्रकोर, प्रतिपदेची तिमिरेत बुडणारी चंद्रकोर अशी चंद्राची विविध दर्शनं सौंदर्यदृष्टी असणा-या मनुष्याच्या मनामध्ये निरनिराळे भाव उत्पन्न करतात.

ऋतुमानानुसारही चंद्राचं सौंदर्य बदलत जातं. हेमंत ऋतूतला चंद्र सुंदर प्रभा लेवून येतो. शरद ऋतूतला चंद्र काळ्याकुट्ट आकाशात तेजाळत असतो. तेव्हा तो इतर ग्रहता-यांना त्यांचं अस्तित्व दाखवण्याचीही संधी देतो. शिशिरातला चंद्र आकाशाला निळाई प्रदान करतो. वसंत ऋतूतला चंद्रमा म्हणजे सौंदयाची पराकाष्ठा असते! याच काळात यमुनेकाठी कृष्णाची रासक्रीडा चालत असे. तो भाव कृष्णभक्तांना असीम आनंद देतो. आत्मिक साधना करणा-या साधकांना मस्तकावर चंद्र धारण केलेलं भगवान शिवांचं दैवी स्वरूप आनंद देतं. पौर्णिमेच्या चंद्राचा निळसर प्रकाश आणि त्यात न्हाऊन निघालेलं अद्भुत आणि दैवी सौंदर्य लाभलेलं मानससरोवर आणि त्यामागचं कैलास पर्वताचं दिव्य शिखर आध्यात्मिक भावुक व्यक्तीला असीम आनंद देतं.

ऐन वसंतातल्या चांदण्या रात्री 'होरी', 'कजरी', 'ठुमरी' 'फागुन'सारखे संगीत प्रकार रसिक गायक-कलावंतांच्या मनाला मोहून टाकतात. आदिम जमाती आणि आदिवासीही या काळात नृत्य-संगीतात रमून जातात; तर हेन्री मॅन्सिनी या प्रख्यात संगीतकारानं रचलेल्या 'मून रिव्हर'सारख्या संगीतरचना त्या-त्या रसिकांनाही आनंद देतात.

पुराणकर्त्यांनी सत्तावीस नक्षत्रांचा स्वामी असलेल्या चंद्राची वास्तविकता कथेतून सांगितली आणि गणपतीच्या कथेतून चंद्राच्या कलांचं वर्णन केलं. चंद्राची महती भारतीयांनी फार पूर्वीच ओळखली होती. आता तर भारतानं चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर 'विक्रम'ला यशस्वीपणे उतरवलं आहे.

दक्षिण ध्रुवावर फिरणारा 'प्रग्यान' नवे नवे शोध लावेल. प्राचीन ज्ञानाप्रमाणेच भारत अशा खगोल मोहिमेतही आपला ठसा निश्चितच उमटवेल. त्याबद्दल भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्त्रो) शास्त्रज्ञांचे जेवढे आभार मानू तेवढे थोडेच आहेत.

चंद्र पोकळ की...

अशा त-हेनं कवी, संगीतकार, तत्त्वज्ञ यांना आनंद देणारा चंद्रमा वैज्ञानिकांना आणि गूढवाद्यांनाही आकर्षित करतो. कोट्यवधी वर्षांपूर्वी मंगळाएवढा एक ग्रह पृथ्वीवर आदळला आणि पृथ्वीचाच एक तुकडा पृथ्वीभोवती फिरत राहिला तोच हा चंद्र, अशी मान्यता आहे.

आधुनिक संशोधनानुसार चंद्रावरचे खडक आणि पृथ्वीवरचे खडक यांच्यामध्ये साधर्म्य असले तरी सर्वच खनिजांमध्ये साम्य नाही. चंद्रावर वातावरण नसल्यामुळे प्राचीन किंवा अवार्चीन जीवनाविषयी कोणताच निर्णय करता येत नाही, असं अमेरिकी संशोधन संस्था 'नासा'चं संशोधन आहे.

चंद्राची सरासरी घनता ३.३ ग्रॅम प्रति घनसेंटीमीटर आहे, तर पृथ्वीची घनता ५.५ ग्रॅम प्रति घनसेंटीमीटर आहे. १९६९ ते १९७७ दरम्यान, अपोलो मोहिमेनं चंद्रावर एक सिस्मोमीटर ठेवला. त्या मीटरनं वेळोवेळी चंद्राच्या कंपनांची नोंद केली. चंद्रावर जेव्हा भूकंप होतात तेव्हा तो घंटेप्रमाणे वाजतो, असं तेव्हा लक्षात आलं.

त्यानंतर २० नोव्हेंबर १९६९ रोजी अपोलो-१२नं जाणूनबुजून चंद्राच्या पृष्ठभागावर चंद्र मॉड्यूलचाच एक भाग आकाशातून चंद्रावर आदळवला. त्यानंतर चंद्र जवळजवळ एक तास घंटानाद करत होता! हा आधार घेऊन, चंद्र हा घंटेसारखा पोकळ असावा, असा युक्तिवाद काही संशोधकांकडून केला गेला. 'नासा' या मताशी सहमत नव्हतं.

मग एक पक्ष चंद्राला पोकळ मानू लागला तर पोकळ जागेचा कोणताही पुरावा नाही, असा 'नासा' युक्तिवाद करू लागलं. पोकळ चंद्राचा आधार घेऊन काही हौशी संशोधक चंद्राबाबत क्रांतिकारी विचारही मांडू लागले. त्यांच्या मते चंद्र हा कृत्रिम उपग्रह असून, तो मुद्दाम पृथ्वीभोवती फिरत ठेवला आहे. पोकळ चंद्राच्या आत एक अतिप्रगत यंत्रणा कार्यरत आहे, असेही अतर्क्य विचार मांडले जाऊ लागले! चंद्राबाबतचं संशोधन अजूनही बाल्यावस्थेत आहे. परंतु; एक गोष्ट मात्र खरी चंद्र नसता तर पृथ्वीवर जीवन संभवलंच नसतं. भरती-ओहोटी ही चंद्रावर अवलंबून असते, ही गोष्ट सर्वज्ञात आहे.

# मेट्रोमुळे वाहतूक कोंडी भविष्यात तरी फुटेल का?



मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकलमधून लाखो मुंबईकर दररोज प्रवास करतात. त्याचप्रमाणे बेस्ट बसमधूनही रोज लाखो प्रवासी प्रवास करत असतात. मुंबईची वाढती लोकसंख्या लक्षात घेता मुंबईकरांना आणखी एका परिवहन सेवेची गरज होती. त्यात आता मुंबईत तीन मेट्रो नव्याने सुरू झाल्यामुळे व भविष्यात आणखी काही मार्ग सुरू होण्याची शक्यता असल्यामुळे मुंबईकरांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल, अशी सर्वांची अपेक्षा होती. मात्र ती फोल ठरली आहे. कारण नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणातून ज्या ठिकाणी मेट्रो सुरू झाली आहे, त्या ठिकणाची वाहतूक कोंडी कमी होण्याच्या ऐवजी वाढलीच असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे एक प्रकारे भविष्यात ही धोक्याची घंटा असू शकते. त्यामुळे यावर आतापासूनच तातडीने काहीतरी तोडगा काढणे आवश्यक बाब बनली आहे. जर इतकी गुंतवणूक करून, एवढा खर्च करून प्रसंगी निसर्गावर आघात करून भविष्यकालीन नियोजनासाठी बनवलेली ही मेट्रो सेवा जर आपले मूळ उद्देशच साध्य करत नसेल तर सा-या नियोजनावरच प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. मुंबईत रेल्वेचे मध्य, हार्बर आणि पश्चिम असे रेल्वेचे तीन मार्ग आहेत. जे मुंबईतल्या बहुतांश भागांना जलद गतीने एकमेकांशी जोडतात; परंतु यामुळे लोकल रेल्वेवर प्रचंड ताण पडतो. रेल्वेच्या या तिन्ही मार्गांवर विशेषतः कार्यालय सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळी मोठी गर्दी होते. यामुळे अनेकदा प्रवासी जीव धोक्यात घालून प्रवास करतात. तर अनेक अपघात होतात, ज्यात प्रवाशांचा मृत्यूदेखील होतो. दुस-या बाजूला रस्ते मार्गावरील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढत आहे. दिवसभर एकाच वेळी येणा-या जड व अवजड वाहनांचा लोंढा, त्यात होणारी वाहतूक कोंडी यामुळे येथील स्थानिक बस सेवा वाहतूक कोंडीत अडकून पडते. त्यामुळे मुंबईत सक्षम पयार्यी वाहतूक व्यवस्थेची गरज निर्माण झाली आणि मुंबईत मेट्रोचे काम सुरू झाले. मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर आणि दक्षिण जोडणा-या मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ या मार्गिका आता सुरू झाल्या आहेत. यापूर्वीच अंधेरी व घाटकोपर यांना जोडणारी मेट्रो एक सेवा सुरू आहे. यामुळे मुंबईकरांना ३५ ते ४० मिनिटांत आपल्या इच्छित स्थळी जाणे आणखी सोपे झाले. या मेट्रो सेवांमुळे पश्चिम द्रूतगती मार्ग व लिंक मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होणार असा दावा केला गेला. जरी प्रवाशांना जलद वाहतुकीचा पर्याय उपलब्ध झाला असला तरी रस्त्यावरील वाहतूक जरा ही कमी झाली नसल्याचे नुकतेच एका सर्वेक्षणात आढळले आहे. का नवीन सर्वेक्षणानुसार मुंबईतील वाहनांची संख्या गेल्या तीन वर्षांत ३५ टक्क्यांनी वाढली आहे तर वांद्रे ते मीरा रोड या पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतुकीत तब्बल ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तीच परिस्थिती पूर्व द्रुतपती महामार्ग म्हणजे सायन ते ठाणे या पट्ट्यात झाली आहे. घाटकोपर ते सीएसटी दरम्यान पूर्व मुक्त मार्ग बांधला गेल्याने तेथील वाहतुकीच्या संख्येत प्रचंड पटीने वाढ झाली आहे. मात्र जुन्या घाटकोपर ते लालबागमार्गे सीएसटीएम मार्गावरील वाहतूक कोंडी आहे, ती तशीच आहे. गेल्या वर्षी म्हणजे विशेषतः कोरोनानंतर या आकडेवाडीत भयंकर वाढ झाली आहे. मुंबईत सध्या परिस्थितीला ४२.१३ लाख वाहने आहेत. कोरोना यात ४.९% हलक्या वाहनांमध्ये वाढ झाली तर ३.५% प्रवासी वाहनात वाढ झाली आहे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने हे शहर व्यापाराचे मोठं केंद्र आहे. मुंबईतील अंदाजे ८० टक्क्यांहून अधिक लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करतात. त्यात रेल्वेपाठोपाठ येथील बेस्ट बस सेवा दुस-या क्रमांकावर आहे, तर नंतर रिक्षा टॅक्सी यांचा नंबर लागतो. आता मेट्रो सेवा हा नवीन पर्याय उपलब्ध झाला आहे. सध्याची उपनगरीय रेल्वे व्यवस्था मुंबईतील दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे; परंतु यावरील वाढता ताण कमी करण्यासाठी आणि आगामी लोकसंख्येचा आणि गरजेचा विचार करता मुंबईत मेट्रोचे जाळे उभारण्यावर भर दिला गेला. मुंबईसारख्या गजबजलेल्या आणि समुद्रालगत असलेल्या शहरात मेट्रो व्यवस्था उभी करणे नक्कीच सोपे नव्हते. याउलट भुयारी मार्ग उभारणे व मुंबईसारख्या गुंतागुंतीच्या व दाटीवाटीच्या शहरात मेट्रो उभी करणे आव्हानात्मक होते. शिवाय, भौगोलिक परिस्थितीमुळे मुंबईत पावसाळ्यात ब-याच ठिकाणी पाणी साचते आणि शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडून जाते. अशा आव्हानात्मक परिस्थितीतही भुयारी व रस्त्यावरून जाणारी मेट्रो सेवा उभारण्याचे काम पूर्णत्वास नेले जात आहे. तसेच मुंबईसारख्या दाटीवाटीच्या ठिकाणी मेट्रोचे सुरू असलेले काम हे गेल्या काही वर्षांपासून सुरु असून आणि यापुढेही कित्येक वर्षे रोजच्या वाहतूक कोंडीला कारणीभूत असणार आहे.

पण मुंबई मेट्रोसारखी पयार्यी व्यवस्था ही शहराची आजची व भविष्यकालीन गरज होती हेही नियोजनकर्त्यांनी ओळखले व त्या दिशेला पावले टाकली. मुंबईकरांची दररोजची ऊर्जा कामावर जाण्यासाठी आणि कामावरून परत घरी पोहचण्यासाठी खर्च होते आणि यात खूप वेळ जातो,' ही तक्रार मुंबईत नोकरी करणारा जवळपास प्रत्येक नोकरदार करत असल्याचे दिसते. कारण मुंबईत नोकरी करणा-यांचा किंवा कामानिमित्त लोकल किंवा बसमधून दररोज प्रवास करणा-यांचा दिवसभरातील बराचसा वेळ प्रवासात जातो. मुंबईत मेट्रोचा विस्तार होत असताना प्रवाशांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा आणखी एक मोठा पर्याय उपलब्ध झाला आहे. मुंबईत आतापर्यंत तीन मेट्रो प्रकल्प सुरू झाले असून बाकी ११ प्रकल्पांचे काम प्रलंबित आहे. मुंबईत सगळीकडे रिअल इस्टेटचे जाळं पसरत चालले आहे, सगळीकडे घरं बांधली गेली.

# जनमन की बात : सरकारने आता चंद्रावरील खड्डे बुजवण्याचा उपक्रम राबवावा !

चांद्रयान -३ ने चंद्रावर पाऊल ठेवल्यानंतर भारताला अनेक क्षेत्राच्या बाबतीत लाभ होणार आहे . 'देशहिताच्या दृष्टिकोनातून '' त्यावर शास्त्रज्ञ विचार करतीलच . पण त्याच बरोबर ''जनहिताच्या दृष्टिकोनातून '' ( जनहित हि नेमकी काय कल्पना असते हे गेल्या ७५ वर्षात जनतेला समजलेले नाही ) चंद्रावरील खड्डे बुजवण्याबाबतच्या उपक्रमाचा सरकारने विचार करावा हे सुचवण्यासाठी हा प्रपंच !

भारतातील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण ,सार्वजनिक बांधकाम विभाग , महानगरपालिका व यांच्या कामाशी संलग्न कंत्राटदार -अधिका-यांना गेल्या अनेक दशकात दजेर्दार रस्ते निर्माण करणे शक्य झालेले नसले तरी '' प्रत्येक पावसाळयात , प्रत्येक रोडवरील त्याच त्या ठिकाणचे खड्डे बुजवण्याच्या बाबतीत ''या यंत्रणा निष्णात आहेत. या अनुभवाचा फायदा चंद्रावरील खड्डे बुजवण्यासाठी करून घेतल्यास त्याचा फायदा केवळ भारतालाच नव्हे तर जगातील सर्व देश जे भविष्यात चंद्रावर पाऊल ठेवू इच्छितात त्यांना होऊ शकतो कारण सध्या सर्वात मोठे आव्हान आहे ते यान उतरवताना खड्डे विरहित सपाट जागेची उपलब्धतता .

आपल्या देशात लोकशाही व्यवस्था असल्याने व सर्व कारभार लोकांच्या हिताच्या दृष्टीने 'नियमानुसार ' चालवला जात असलयाने '' लोकहित ,जनहित '' या सबबी अंतर्गत राष्ट्रीय प्राधिकरण अध्यक्ष ते महापालिका आयुक्त पर्यतच्या सर्व यंत्रणांनी '' चंद्रावरील खड्डे बुजविण्यासाठीचा उपक्रम सुरु करा व आम्हाला चंद्रावरील खड्डे बुजविण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना तयार करण्यासाठी परवानगी तातडीने द्या अशी फाईल ' बनवावी '( अर्थातच ती स्वतः कंत्राटदाराने 'बनवून ' दिल्यास योग्य राहील कारण त्यात कुठल्याच त्रुटी उरणार नाहीत ) व ती तातडीने संमत करण्यासाठी सरकारकडे पाठवावी . अशी १४० करोड जनतेची मागणी आहे हे फाईल मध्ये नमूद करावे कारण वरच्या पातळीवरील सरकार जनहिताच्या फाईलींना तातडीने संमती देते हा आजवरचा इतिहास आहे. जनहितासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमाचा ध्यास हा भारतातील सर्वच सरकारी यंत्रणांना व लोकप्रतिनिधींना असतो हे आजवर सातत्याने दिसून आलेले आहे . चंद्रावरील खड्डे बुजवणे हा अत्यंत नाविन्यपूर्ण उपक्रम असल्याने '' करदात्या नागरिकांच्या निधीचा योग्य प्रकारे विनियोग '' या नियमानुसार काम करणा-या सरकारने तातडीने ''चंद्रावरील खड्डे बुजवणे उपक्रमाचा '' अभ्यास करण्यासाठी ''तज्ज्ञांची अभ्यास समिती '' घटित करावी . त्यातही जलद गतीने अभ्यास करावयाचा असेल तर आमदार -खासदार -अधिकारी ( त्यात ही जे मंत्री होऊ इच्छितात त्यांना प्राधान्य द्यावे ) यांची संयुक्त ''अभ्यास समिती '' स्थापन करून त्यांना थेट चंद्रावर जाऊन ( रोजची सवय असली तरी ''याना '' द्वारे ) अभ्यास करण्यासाठी ' अभ्यास दौरा '' आयोजित करावा .

''सबका साथ ,सबका विकास '' या तत्वाने गेली काही दशके अत्यंत ''प्रामाणिक '' पणे खड्डे बुजवणारे कंत्राटदार , अधिकारी , स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मागे जनतेने , प्रसारमाध्यमांनी 'च्यांव -च्यांव '' सुरु झालेली आहे . त्यातच भर म्हणजे मा . न्यायालयाने देखील खड्ड्यांच्या बाबतीत कडक धोरण राबलेले असल्याने '' खड्ड्यांशी '' निगडित सर्वच घटकांना ''अच्छे दिन '' उरलेले नाहीत . खड्डे बुजवण्याच्या विविध पद्धतीचा वापर करण्याचा देखील कंत्राटदारांना कंटाळा आलेला आहे . या पार्श्वभूमीवर ''जनहिताच्या '' दृष्टीने या सर्व घटकांना बदल ( खड्डे बुजवण्याच्या बाबतीत नव्हे तर ठिकाणाच्या दृष्टीने ) हवा आहे आणि ''चंद्रावरील खड्डे'' हा सर्वात चांगला पर्याय ठरू शकतो .

आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे सर्व राजकीय पक्षाचे आमदार व खासदार यांना देखील चंद्रावर विविध प्रकारच्या लोकपोयोगी ( ? ते काय असते ते आजवर जनतेला कळलेले नाही पण तसे म्हणण्याचा प्रघात आहे ) योजना राबवण्यासाठी , चंद्रावर रस्ते निर्माण करण्यासाठी व त्यावर लगेचच पडणारे खड्डे बुजवण्यासाठी आमदार -खासदार निधी वापरण्याची परवानगी द्यावी . आमदार -खासदार निधीचा वापर कसा केला गेला याची माहिती लोकशाही तत्वानुसार जनतेसमोर '' न '' ठेवण्याची अट चंद्रावरील खर्चाच्या बाबतीत देखील तशीच ''चालू '' ठेवावी अशी मागणी देखील लोकप्रतिनिधींची आहे असे देखील कळते आहे . त्यास विश्वसनीय सूत्रांनी दुजोरा दिलेला आहे . चंद्रावरील खड्डे बुजविण्याच्या उपक्रमाचा सर्वात मोठा फायदा हा असू शकतो की , तेथील खड्डे बुजवण्याच्या दजार्बाबत जनतेकडून ,प्रसारमाध्यमांकडून चर्चा केली जाणार नाही . '' झाकली मूठ लाखाची की करोडीची '' हे कोणालाच कळणार नाही आणि पारदर्शक कारभाराच्या स्वप्नपूर्ती ,वचनपूर्ती च्या दिशेने हे महत्वाचे पाऊल ठरू शकते .

तळटीप : व्हाटसअँप विद्यापीठावरील प्राप्त 'ब्रेकिंग न्यूज '' नुसार सर्वाधिक खड्डे बुजवण्याच्या अनुभव असल्याचा दावा करत मुंबई -ठाणे -पुणे -नागपूर -नवीमुंबईच्या आयुक्तांनी चांद्रयान -३ च्या यशस्वी सॉफ्ट लँडिंग झाल्यानंतर तातडीने कंत्राटदारांची सभा घेऊन सर्व ''अनुभवी '' कंत्राटदाराच्या फाईल स्कॅन करत ''ई -फाईल '' द्वारा पाठवून सरकारच्या '' ई -प्रशासनांतर्गत पहिली फाईल मंत्रालयात मंजुरीसाठी पाठवल्याचे वृत्त आहे . आगामी १४ दिवसात रोव्हर चंद्रावरील डेटा गोळा करेपर्यंत सर्व सरकारी सोपस्कार पार पाडले जाऊन चंद्रावरील खड्डे बुजवण्याची परवानगी सरकार कडून दिली जाईल अशी माहिती नाव न छापण्याच्या अटीवर आगामी मंत्रिमंडळ विस्तारात शंभर टक्के आपला 'नंबर ' लागणार अशी खात्री असणा-या ''भावी मंत्र्यांनी '' सूत्रांना माहिती दिल्याचे समजते .

**सुधीर लक्ष्मीकांत दाणी ,**
**लेखक संपर्क : ९८६९२२६२७२**
dfisudhir@gmil.com

पोलीस बातमी पत्र


संमिश्र

४

मुंबई, मंगळवार २९ अगस्त ते ०४ सप्टेंबर २०२३

# रेल्वे स्थानकात प्रवाशांचे मौल्यवान सामान चोरणा-यांना पोलिसांनी ठकल्या बेड्या

कल्याण रेल्वे स्थानकात रेल्वेची वाट पाहणारे प्रवाशांच्या सामानातून त्यांच्या नकळत सामानाची चोरी करणा–या दोन सराईत चोरांना कल्याण रेल्वे गुन्हे शाखेने अटक केली आहे. दिनेश निनावे (वय 33) आणि संतोष चौधरी (वय 35) अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी 51 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, 6 मोबाईल फोन असा ऐवज जप्त केला आहे. तसेच कल्याण रेल्वे स्थानकातील 4 व ठाणे रेल्वे स्थानकातील 1 अशा 5 गुन्ह्यांची उकल पोलिसांनी केली आहे. मे महिन्यात या चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल झाला असून तीन महिन्यानंतर त्यांना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.



कल्याण रेल्वे स्थानकातून महालक्ष्मी एक्सप्रेस मध्ये चढताना एका प्रवाशाची सोन्याचे दागिने असलेली बॅग चोरीला गेल्याची घटना मे महिन्यात रात्रीच्या वेळी घडली होती. याप्रकरणी कल्याण लोहमार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास कल्याण रेल्वे गुन्हे अन्वेषन विभागाकडून केला जात होता. तांत्रिक विश्लेषण व इतर बाबींच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला असता दिनेश याला पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडे तपास केला असता त्याने साथीदार संतोष याच्या मदतीने चो-या केल्याची कबुली दिली. पोलिसांनी संतोष यालाही सापळा रचून अटक केली.

पोलिसांनी त्यांच्याकडून 51 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच 5 मोबाईल, 1 टॅब असा एकूण 4 लाख 14 किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. कल्याण रेल्वे पोलिस ठाणे येथील 4 व ठाणे रेल्वे पोलिस ठाण्यातील 1 गुन्ह्याची कबुली या आरोपींनी दिली असून पोलिस अधिक तपास करत आहेत. रेल्वे प्रवाशांनी प्रवास करताना आपल्या किंमती मालमत्तेची काळजी घेण्याचे आवाहन रेल्वे पोलिसांनी केले आहे. प्रवाशांच्या तक्रारीनुसार गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी अशरुद्दीन शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु असताना पोलिसांनी स्थानक परिसरातील सीसीटिव्ही तपासले. या तपासात दोन चोरटे हे रेल्वे स्थानकात रेल्वेची वाट पाहणा-या प्रवाशांना लक्ष करीत त्यांच्या बॅगमधील सामान चोरुन पळ काढायचे, गाडीत चढण्याची लगबग असलेल्या प्रवाशांची बॅग हिसकावून पळणे अशा चो-या करताना आढळून आले.

# सिद्धीविनायकाच्या नावाने गंडा घालणा-या व्यक्तीला पश्चिम बंगालमधून अटक,

## ऑनलाईन दर्शनाच्या नावाखाली करायचा फसवणूक

**मुंबई : सिद्धविनायकाच्या नावे भाविकांची फसवणूक करणा-या सुपर्नो प्रदीप सरकार याला दादर पोलिसांनी पश्चिम बंगालमधून अटक केलीय. हा आरोपी मोबाईल अॅपद्वारे सिद्धिविनायक मंदिरात ऑनलाईन दर्शन आणि पूजा करण्याच्या बहाण्याने भाविकांची फसवणूक करायचा. त्यासाठी भाविकांकडून 701 ते 21 हजार रुपये घ्यायचा.**

तपासात ज्या बँक खात्यात पैसे वळवले गेले ते सरकारचे असल्याचे पोलिसांना आढळले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने ऑनलाईन दर्शन देण्याच्या बहाण्याने भाविकांकडून 701 ते 21,000 रुपयांपर्यंत पैसे घ्यायचा. तपासात ज्या बँक खात्यात पैसे वळवले गेले ते सरकारचे असल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. दादर पोलीस आता सुब्रजित बसू, प्राजक्ता सामाता आणि अनिता डे या सुपर्नोच्या साथीदारांचा शोध घेत आहेत. सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टच्या अधिका-यांनी दादर पोलिसांत तक्रार केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.



**'उत्सव' अपवरून भाविकांची फसवणूक**

पेडर रोड येथील एका गृहिणीने ट्रस्टशी संपर्क साधला आणि दावा केला की तिची 21,001 रुपयांची फसवणूक झाली आहे. तिने सांगितले की तिच्या वडिलांना ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते आणि तिला त्यांच्यासाठी प्रार्थना करायची होती म्हणून तिने उत्सव अॅपद्वारे ऑनलाईन पूजा बुक केली. त्याच आठवड्यात काही भाविक प्रसाद मागणीसाठी मंदिरात आले. त्यांच्याकडे पैशाबाबत विचारणा केली असता त्यांनी 'उत्सव' अॅपवरून ऑनलाइन दर्शन आणि पूजा केली असून प्रसाद मंदिरात मिळेल असे सांगितले. यासाठी पैसेही ऑनलाइन पाठविल्याचे हे भाविक म्हणाले. ही भाविकांची फसवणूक असल्याने या प्रकाराची गंभीर दखल न्यासाने घेतली. ट्रस्टकडे आणखी काही तक्रारी आल्या आहेत.सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टच्या अधिका-यांनी दादर पोलिसांत तक्रार केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आलं. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### सिद्धिविनायक ट्रस्टच्या माध्यमातून बांदेकर मानले पोलिसांचे आभार

**सिद्धिविनायक ट्रस्टच्या माध्यमातून बांदेकर यांनी या कारवाई संदर्भात पोलिसांचे आभार मानले. तसेत त्यांनी नागरिकांना व भाविकांना आवाहन केले की कोणत्याही अपच्या माध्यमातून बुकिंग करू नये. बुकिंग करताना सिद्धीविनायक मंदिर संस्थानाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.**

# महागाईचा फटका! मुंबईत 1 सप्टेंबरपासून सुटे दूध महागणार...

## दुधाच्या दरात 2 ते 3 रुपयांची वाढ



**मुंबई :** सर्वसामान्यांना बसणारी महागाईची झळ काही कमी होत नाही. मुंबईत 1 सप्टेंबरपासून सुटे दूध महागणार आहे. एक लीटर म्हशीचे सुटे दूध रिटेलमध्ये 2 ते 3 रुपयांनी महागणार आहेत. होलसेल दरातही 2 रुपयांनी वाढ होणार आहे. शनिवारी दूध विक्रेत्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. जनावरांच्या चा-याच्या दरात वाढ झाली असून, त्याचा परिणाम दूध उत्पादकांवर होत आहे. त्यामुळे याचा परिणाम आता दूधाच्या दरावरही होणार आहे. सध्या म्हशीच्या सुटे एक लीटर दूधाचा दर 85 रुपये आहे. हा दर आता 87 रुपये होईल, तर रिटेलला हे दूध 87 ते 88 रुपये होईल. मंत्री रुपाला यांनी संसदेत सांगितले की, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग देशातील दुधाच्या दरावर नियंत्रण ठेवत नाही. देशात दूध खरेदी-विक्रीचे नियमन सरकार करत नाही.

### मुंबईत 1 सप्टेंबरपासून सुटे दूध महागणार

**एक लिटर म्हशीचे सुटे दुध रिटेलमध्ये 2 ते 3 रुपयांनी महागणार तर होलसेल दरातही 2 रुपयाने वाढ होणार आहे. मुंबई शहरात तीन हजाराहून अधिक दूध विक्रेते आहेत. शनिवारी मुंबईतील सर्व दूध विक्रेत्यांची बैठक पार पडली, त्याबैठकीत दूध दरासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. जे ब्रॅन्डेड किंवा पॅकेटबंद दूध नसते, ज्याची विक्री सुट्या पद्धतीने केली जाते अशा दुधाच्या किमतीत वाढ होणार आहे. जनावरांच्या चा–याचे भाव वाढले आहेत. चा–याच्या दरात वाढ झाल्याने याचा परिणाम दूध उत्पादकांवर होत आहे. हे पाहता दूध उत्पादकांनी सुट्या दुधाच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.**

### चारा टंचाईचा परिणाम दूध व्यवसायावर

**अर्धा पावसाळा संपत आला पण राज्यात अनेक भागात जोरदार पाऊस झाला नाही. पावसाने पाठ फिरवल्याचा परिणाम हा जसा शेतीवर झालाय तसाच दुग्धव्यवसायावर देखील झालाय. अनेक भागात चारा टंचाईला सुरुवात झाली आहे. राज्यातील अनेक भागात श्रावण महिना सुरू झाला तरी पावसाने दांडी मारल्याने ऊस, मका पिकासह अन्य पिकेही काही प्रमाणात धोक्यात आली आहेत. त्यामुळे याचा परिणाम दूध व्यवसायावर होत आहे.**

# फोन टॅपिंग प्रकरण बंद!

## कोटार्ने मान्य केला सीबीआयचा क्लोजर रिपोर्ट

मुंबई : फोन टॅपिंग प्रकरणात सीबीआयने दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट न्यायालयाने स्वीकारला आहे. तसेच या रिपोर्टमध्ये काही महत्त्वाचे दावे देखील करण्यात आले आहेत. एसआयडीमधून गोपनीय माहिती लीक झाली होती. पण हे कोणी केलं हे तपासात शोधता आलं नसल्याचं या अहवालामध्ये सीबीआयने स्पष्ट केलं आहे. दरम्यान, एसआयडी ऑफिसमधील कंप्युटर हॅक झाल्यानेच तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही माहिती गेली असल्याचा दावा साबीआयने केला आहे. तर या प्रकणात ऑडिओ रेकॉर्डिंग्स कोणत्यातरी अज्ञात व्यक्तीने त्यांच्यापर्यंत पोहचवला आहे. पण त्या व्यक्तीचा शोध या तपासामध्ये घेता आला नाही, असं साबीआयनं म्हटलं आहे.



**नेमकं प्रकरण काय?**

मार्च 2021 मध्ये तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी वरिष्ठ पोलीस अधिका-यांच्या बदल्यांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला होता. दलालांमार्फत पोलिसांच्या बदल्या होत असल्याचा त्यांचा आरोप होता. या संदभार्तील तत्कालीन राज्य गुप्तवार्ता विभागाच्या प्रमुख रश्मी शुक्ला यांनी तत्कालीन पोलीस महासंचालकांना लिहिलेल्या पत्राचा हवाला फडणवीस यांनी दिला होता. सोबतच कॉल रेकॉर्डिंग असलेला एक पेनड्राईव्ह देखील समोर आणला. त्यानंतर हा पेनड्राईव्ह पुढे केंद्रीय केंद्रीय गृह विभागाला तपासणीसाठी पाठवला.

तर तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने वरिष्ठ आयपीएस अधिका-यांमधील गोपनीय पत्र उघड झाल्याचा गुन्हा अनोळखी व्यक्ती विरोधात दाखल केला होता. या प्रकरणात स्वतः देवेंद्र फडणवीस यांचा देखील जबाब नोंदवण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला. हे प्रकरण कुलाबा पोलीस ठाण्यात वर्ग होण्यापूर्वी सायबर सेलच्या अंतर्गत होते. यावर एसआयडी अधिकारी कायोमेर्झ इराणी म्हणाले की, 'त्यांना संशय आहे की राज्य गुप्तचर विभागाच्या प्रमुखांनी डीजीपीला पाठवलेले पत्र फडणवीस यांना अज्ञात व्यक्तीने पाठवले होते.'

### फडणवीसांनी देखील नोंदवला होता जबाब...

**या प्रकरणी तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा देखील जबाब नोंदवण्यात आला होता. देवेंद्र फडणवीस यांनी वरिष्ठ पोलिसांच्या बदलीमध्ये सुरू असलेल्या कथित भ्रष्टाचार उघड केला होता. या संदर्भाततत्कालीन राज्य गुप्तवार्ता विभागाच्या प्रमुख रश्मी शुक्ला यांनी तत्कालीन पोलीस महासंचालकांना लिहिलेलं पत्र त्यांनी उघड केलं होतं. तसेच याप्रकरणातील पेन ड्राईव्ह देखील समोर आणला होता. दरम्यान याप्रकणी मविआ सरकारने आरोपांचा तपास करण्याऐवजी गोपनीय कादरपत्रे लीक झाल्याचाच गुन्हा दाखल केला होता. हेच प्रकरण आता बंद करण्याचा सीबीआयने घेतला होता आणि त्याचा क्लोजर रिपोर्ट देखील न्यायालयाने स्वीकारला आहे.**

# समाजवादी चळवळीचा इतिहास पुसण्याचा प्रयत्न

**विरार :** राज्यातील अनेक चळवळी, आंदोलनांचे केंद्र राहिलेले आणि समाजवादी नेत्यांचा वावर असणारे जनता दलाचे कार्यालय अन्य पक्षांना देणे म्हणजे इतिहास पुसण्याचा प्रयत्न सुरू आहे. हा राज्य सरकारकडून लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न आहे, अशी टीका माजी आमदार डॉमनिक घोन्साल्विस यांनी राज्य सरकारवर केली आहे.

ज्येष्ठ समाजवादी नेत्या मृणाल गोरे, मधू दंडवते, निहाल अहमद, एस. एम. जोशी, ग. प्र. प्रधान, नानासाहेब गोरे, बापूसाहेब काळदाते अशा नेत्यांचा वावर झालेले जनता दल सेक्युलर पक्षाचे चर्चगेट येथील कार्यालय प्रहार जनशक्ती पक्षाला देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आपण आमदार होण्याच्या अगोदर या कार्यालयात जात असे. आमदार झाल्यानंतर आमदारकीच्या काळात नेहमी पक्ष कार्यालयात जात असे. मृणाल गोरे या अध्यक्ष असताना नेहमी कार्यालयात जात असत.

# थोडक्यात

## माथेरानमध्ये भूस्खलन रोखण्यासाठी 'गॅबियन' ठरणार वरदान...

**माथेरान :** अतिवृष्टीमुळे शहरातील पाण्याबरोबर मातीही मोठ्या प्रमाणात वाहून जाते. जमिनीची धूप होत असल्याने भूस्खलनाच्या घटना घडतात. हे टाळण्यासाठी काळ्या दगडाच्या गॅबियनची बांधबंदिस्ती वरदान ठरल्याने एमएमआरडीएने रस्त्याच्या दुतर्फा बांधणी सुरू केली आहे. माथेरानच्या काळ्या डोंगरावर लाल मातीचा थर आहे. यंदा जुलैमध्ये तब्बल चार हजार मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस कोसळल्याने काही ठिकाणी जमिनीची मोठ्या प्रमाणात धूप झाली.

मालडुंगा पॉईंट परिसरात पावसाळी नाले नसल्याने भूस्खलनाची दुर्घटना घडली. तर दुसरीकडे रस्त्याची कामे करताना ज्याठिकाणी गॅबियनची बंदिस्ती करण्यात आली होती, त्या परिसरात जमिनीची धूप अथवा भूस्खलन झाले नसल्याचे दिसून आले. दस्तुरी ते अहिल्याबाई होळकर चौक, एको पॉईंट, हार्ट पॉईंट, मायरा पॉईंट तसेच पॅनोरमा पॉईंट या ठिकाणी गॅबियन टाकले आहे. धूप प्रतिबंधामुळे झाडांची पडझड कमी झाली असून वनक्षेत्र वाढले आहे.

## सांताक्रूझमधील गॅलेक्सी हॉटेलला आग, फ्लाईट चुकली आणि गेला जीव, जखमींना डिस्जार्च

**मुंबई :** सांताक्रूझच्या गॅलेक्सी हॉटेल मध्ये लागलेल्या आगीत तिघांचा मृत्यू झाला. या मृतांपैकी २५ वर्षीय रुपल कांजी आणि २८ किशन या दोघांचा साखरपुडा झाला होता. त्यांची रविवारी रात्री (मध्यरात्री) २ वाजता आफ्रिकेला जाण्याची फ्लाईट होती. पण, ती चुकल्याने ते गॅलेक्सी हॉटेलमध्ये थांबले होते. यादरम्यान हॉटेल मध्ये आग लागली आणि त्यांचा जीव गेला. जर या दोघांची फ्लाईट चुकली नसती तर त्यांचा जीव वाचला असता. ही माहिती एका पोलीस अधिका-यांनी दिली. यात ४८ वर्षीय कांतीलाल गोवर्धन वारा यांचा ही मृत्यू झाला आहे. मात्र, त्यांची पूर्ण माहिती उपलब्ध झाली नाही. यात दोघे जण जखमी झाले होते. अल्फा वखारिया (१९) आणि मंजुळा वखारिया (४९) यांना रुग्णालयात निरीक्षणाखाली ठेवण्यात आले होते. मात्र, त्यांची प्रकृती स्थिर असून त्या दोघांना रुग्णालयातून डिस्जार्च दिला आहे, असे रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. हरभजनसिंग बावा यांनी सांगितले.

# "दिल्ली बनेगा खलिस्तान", मेट्रो स्थानकांच्या भिंतींवर लिहिल्या घोषणा; सुरक्षा यंत्रणा सक्रिय




**प्रतिनिधि**

नवी दिल्ली - भारताच्या राजधानीत म्हणजेच दिल्लीत जी २० शिखर परिषद ९ आणि १० सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेसाठी जगभरातील मंडळी दिल्लीत दाखल होणार आहेत. मात्र, त्याआधीच दिल्लीतील मेट्रा स्थानकांच्या अनेक भिंतींवर "दिल्ली बनेगा खलिस्तान" असं लिहिण्यात आलं आहे.

दिल्ली पोलिसांनी याबाबत रविवारी माहिती दिली असून ही भित्तीचित्रे काढून टाकण्यात आल्याची माहिती मेट्रोतील अधिकाऱ्यांनी दिली आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिले आहे. दिल्लीतील पंजाबी बाग, शिवाजी पार्क, मादीपूर, पश्चिम विहार, उद्योग नगर आणि महाराजा सूरजमल स्टेडिअमसह मेट्रो स्थानकांच्या भिंतींवर 'दिल्ली बनेगा खलिस्तान', 'खालिस्तान जिंदाबाद' अशा घोषणा काळ्या रंगात लिहिलेल्या आहेत. दिल्लीतील अनेक मेट्रो स्थानकांवर सिख फॉर जस्टिस या बंदी असलेल्या संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनीच ही भित्तीचित्रे रंगवली असल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे. तसंच, नांगलोई येथील सरकारी सर्वोदय बाल विद्यालयाच्या भिंतींवरही भारतविरोधी भित्तीचित्रे रंगवली होती. दिल्ली पोलिसांचा स्पेशल सेल आता या प्रकरणात सक्रिय झाला असून विविध ठिकाणी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. संशयितांचा शोध घेऊन त्यांना लवकरात लवकर अट केली जाईल, त्यासाठी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

# वर्गातील फलकावर 'जय श्री राम' लिहिल्याने विद्यार्थ्याला मारहाण, शिक्षकाला अटक

**प्रतिनिधि**




कठुआ - उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर येथील एका शाळेत शिक्षिकेने वर्गातील विद्यार्थ्यांना एका मुस्लीम विद्यार्थ्याला मारहाण करायला लावली आहे. संबंधित घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली. हे प्रकरण ताजं असताना आता जम्मू-काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यातील सरकारी शाळेत शिक्षकाने विद्यार्थ्याला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. संबंधित विद्यार्थ्याने वर्गातील फलकावर 'जय श्री राम' लिहिल्याने ही मारहाण झाल्याचं बोललं जात आहे. याप्रकरणी आरोपी शिक्षकासह शाळेच्या मुख्याध्यापकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी शनिवारी आरोपी शिक्षकाला अटक केली आहे. तर मुख्याध्यापक फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३२३ (स्वैच्छिकपणे दुखापत करणे), ३४२ (चुकीच्या पद्धतीने बंदिस्त करणे), ५०४ (जाणूनबुजून अपमान करणे), ५०६ (धमकावणे) आणि बाल न्यायाचं कलम ७५ (मुलांशी क्रूरता) अंतर्गत शिक्षक आणि मुख्याध्यापकावर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत. कठुआ येथील या प्रकारानंतर उपायुक्तांनी या घटनेच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे. याबाबतची माहिती उपायुक्तांनी स्वतः अधिसूचना जारी करत दिली. या समितीमध्ये बानीचे उपविभागीय दंडाधिकारी, कठुआचे उप शिक्षणाधिकारी आणि खरोटे येथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक यांचा समावेश आहे.

# मणिपूरमधील १७ हिंसाचार प्रकरणांची सुनावणी आसाममध्ये; सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**प्रतिनिधि**

नवी दिल्ली - मणिपूरमध्ये दोन महिलांची विवस्त्रावस्थेत धिंड काढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याच्या प्रकारासह हिंसाचाराच्या १७ प्रकरणांची सुनावणी आसाममध्ये घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिले. या गुन्ह्यांचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) केला आहे. हिंसाचार पीडित आणि साक्षीदार यांच्या व्हर्च्युअल उलट तपासणीसह न्यायालयीन प्रक्रियेबाबत सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्देश दिले आहेत. मणिपूरमधील सध्याचे एकंदर वातावरण आणि निष्पक्ष फौजदारी न्याय प्रक्रियेची गरज लक्षात घेऊन हे निर्देश देण्यात येत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने 'सीबीआय'ने तपास केलेली प्रकरणे आसामकडे हस्तांतरित



करण्यास विरोध करणाऱ्या वकिलांचे युक्तिवाद फेटाळून लावले आणि केंद्र तसेच मणिपूर सरकारची बाजू मांडणारे महान्याय अभिकर्ता तुषार मेहता यांचे म्हणणे स्वीकारले. उत्तम 'इंटरनेट कनेक्टिव्हिटी' लक्षात घेऊन मेहता यांनी संबंधित प्रकरणे आसाममध्ये हस्तांतरित करण्याची विनंती खंडपीठाला केली होती. आरोपींना हजर करणे, त्यांचा रिमांड, न्यायालयीन कोठडी, कोठडी वाढवणे आणि तपासासंदर्भातील इतर कार्यवाहीचे सर्व अर्ज अंतर आणि सुरक्षितता लक्षात घेऊन ऑनलाइन पद्धतीने चालवण्याची परवानगीही सर्वोच्च न्यायालयाने दिली.

**गुवाहाटी उच्च न्यायालयाला न्यायाधीश नियुक्तीची विनंती**

सर्वोच्च न्यायालयाने गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना मणिपूरमधील खटल्यांच्या सुनावणीसाठी प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी किंवा सत्र न्यायाधीशांहून वरिष्ठ दर्जाच्या एक वा त्याहून अधिक अधिकाऱ्यांची नावे सुचवण्याची विनंती केली. ''गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींनी प्राधान्याने मणिपूरमधील एक किंवा अधिक भाषा जाणणाऱ्या न्यायाधीशांची निवड करावी, असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898